POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२२२ ● मुंबई, शुक्रवार, १४ मार्च २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA




## राज ठाकरे-उद्धव ठाकरे गुढीपाडव्याला एकत्र येणार?
## ठाकरे बंधू मिलन कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका व्हायरल

**■मुंबई। प्रतिनिधी :**

राज्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर सध्या सर्वच पक्षाकडून महापालिका निवडणुकांची तयारी केली जात आहे. त्यातच विधानसभा निवडणुकीनंतर ठाकरे बंधूंनी एकत्र यावं अशी भावना सर्वच मराठी माणसांकडून व्यक्त केली जात आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे एकत्र यावे यासाठी आता मुंबईतील मराठी सेना ॲक्शन मोडमध्ये आली आहे. येत्या गुढीपाडव्याच्या निमित्ताने ठाकरे बंधू मिलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मुंबईत हा कार्यक्रम पार पडणार आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे यासाठी मुंबईतील मराठी सेना ॲक्शन मोडमध्ये आली आहे. येत्या ३० मार्च रोजी ठाकरे बंधू मिलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

यापूर्वी मराठी सेना पक्षाने दादर सेना भवन परिसरात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे अशा आशयाचे बॅनर लावले होते. त्यानिमित्ताने आज बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळावर निमंत्रण पत्रिका ठेवली आहे. ही निमंत्रण पत्रिका ठेवून बंधूत्वाचा संदेश देण्याचा प्रयत्न सुरु करण्यात आला आहे. येत्या गुढीपाडव्याला हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना निमंत्रित केलं जाणार आहे.

### "महाराष्ट्राला सध्या या दोघांची गरज"


"आज होळीचा सण आहे, त्यामुळे होळीला सर्व काही विसरुन राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे. बंधू बंधूसाठी धावून येतो. महाराष्ट्राला सध्या या दोघांची गरज आहे. तसेच एका सक्षम नेतृत्वाची गरज आहे. मराठी माणूस मराठी माणसासोबत भांडतो. दोन गटात विभाजन झाले आहे. दोन ठाकरे ब्रँड वेगळे झाले आहेत. जर ते एकत्र आले तर कुठेतरी मराठी माणसाला किंवा विविध कामगार सेनेला बळ मिळेल", अशी भावना मोहनिश रविंद्र राऊळ यांनी व्यक्त केली आहे.

### निमंत्रण पत्रिकेत काय?

बंधू मिलन निमंत्रण, भाऊ माझा आधार, माझ्या ध्येयाचा किनारा, आयुष्याच्या प्रत्येक सुख दुःखाचा सोबती, भाऊ माज्या जीवनाचा आधार. बंधू मिलन कार्यक्रम दिनांक ३० मार्च २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज मैदान मुंबई येथे सकाळी ११ वाजता स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती स्थळाजवळ घेण्याचे योजिले आहे. मराठी माणसाच्या हितासाठी एकत्र येण ही काळाची गरज आहे, तरी आपली उपस्थिती वंदनीय असेल, असे या निमंत्रण पत्रिकेत नमूद करण्यात आले आहे. मोहनिश रविंद्र राऊळ यांनी ही निमंत्रण पत्रिका बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीस्थळावर ठेवली आहे.




## महाराष्ट्रात खळबळ!
### बारावीच्या उत्तरपत्रिका जळाल्या... शिक्षिकेवर गुन्हा दाखल



**■मुंबई। प्रतिनिधी :**

विरारमध्ये १२ वीच्या उत्तरपत्रिका जळाल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. शिक्षीकेने उत्तरपत्रिका तपासण्यासाठी घरी आणल्या होत्या. मात्र, घरात लागलेल्या आगीमध्ये संपूर्ण उत्तर पत्रिकेचा गठ्ठा जळाला. यामुळे खळबळ माजली आहे. याप्रकरणी शिक्षिकेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्यात सध्या शिक्षण विभागाकडून बारावी बोर्डाच्या उत्तरपत्रिका तपासण्याचं काम युद्धपातळीवर सुरू आहे. विरार मध्ये राहणाऱ्या एका शिक्षिकेने उत्तर पत्रिका तपासण्यासाठी घरी आणल्या होत्या. कामानिमित्त शिक्षिकेच्या घरातील लोक बाहेर गेले. त्यांचे घर बंद असतानाच शॉर्ट सर्किट झाल्याने घरामध्ये मोठी आग लागली, ज्यामध्ये या पेपरसह घरातील इतर सामानही जळून खाक झाले आहे. घरात लागलेल्या आगीमध्ये संपूर्ण उत्तर पत्रिकेचा गठ्ठा जळून खाक झाला आहे. विरार पश्चिम आगाशी परिसरात ही शिक्षिका राहणारी असल्याची माहिती समोर येत आहे. याचा व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. बारावीच्या उत्तर पत्रिका शाळेत तपासणे बंधनकारक असताना या उत्तर पत्रिका घरी कशा पोहोचल्या असा प्रश्न उपस्थित होतोय. प्राथमिक माहितीत प्राध्यापकाने उत्तर पत्रिका शिक्षकांना तपासायला दिल्या होत्या. उत्तर पत्रिकांची तपासणी पूर्ण झाली होती. दरम्यान या संपूर्ण प्रकाराची चौकशी करण्यात येईल, आणि कारवाईही केली जाईल अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसेंनी दिली.

उत्तरपत्रिका शाळेत तपासल्या पाहिजेत असा नियम असताना या शिक्षिकेने नियम मोडत उत्तरपत्रिका घरी तपासायला आणल्या, आणि त्या जळाल्या. आता या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न मात्र ऐरणीवर आला आहे. उत्तरपत्रिका जळाल्याप्रकरणी शालेय शिक्षण विभागाचे स्पष्टीकरण

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च २०२५ च्या उत्तरपत्रिका जळाल्याची घटना विरार येथे घडली. या उत्तरपत्रिका वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (ओसी) या विषयाच्या असून उत्तरपत्रिकांचे परीक्षण करण्यासाठी मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या परीक्षकाने त्यांच्याकडील ३०० उत्तरपत्रिका (परीक्षण करून) तपासून उत्तरपत्रिका कस्टोडियन असलेले प्राचार्य यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या होत्या. संबंधित कस्टोडियन प्राचार्य यांनी उत्तरपत्रिका नियामक यांच्याकडे सुपूर्द केल्या. सदर उत्तरपत्रिका नियामक यांच्यामार्फत घरी नेण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे व त्यांच्या घराला आग लागल्यामुळे त्यांच्याकडे असलेल्या उत्तरपत्रिकांपैकी 175 उत्तरपत्रिका जळाल्या असल्याची माहिती नियामकाने राज्य परीक्षा मंडळास दिली आहे.

उत्तरपत्रिका या नियामकाने कनिष्ठ महाविद्यालयातच तपासणे राज्य परीक्षा मंडळाच्या नियमावलीनुसार बंधनकारक असूनही सदर नियामकाने उत्तरपत्रिका घरी नेल्याचे आढळून आले आहे. सदर उत्तरपत्रिका घरी नेण्यास परवानगी देणे हे देखिल राज्य परीक्षा मंडळाच्या मार्गदर्शक पुस्तिकेनुसार नियमबाह्य आहे. तरीही प्राचार्यांनी उत्तरपत्रिका घरी नेण्यास परवानगी दिली आहे. मंडळाच्या नियमाचा व गोपनियतेचा भंग केल्याने सबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक यांच्यावर मंडळाच्या नियमान्वये उत्तरपत्रिकांचे नुकसान करणे या कारणास्तव बोळींज, पोलिस ठाणे, विरार येथील पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचबरोबर सदर प्रकरणी मंडळ नियमावली व शिक्षासूचीनुसार प्राचार्य व शिक्षिकांवर चौकशी अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

## सतीश भोसले उर्फ खोक्याला छत्रपती संभाजीनगरमध्ये आणलं

**■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी :**

बीड पोलीस सतीश भोसले उर्फ खोक्याला घेऊन छत्रपती संभाजीनगरमध्ये दाखल झाले आहेत. सतीश भोसले उर्फ खोक्याला दोन दिवसांपूर्वी प्रयागराजमध्ये अटक करण्यात आली होती. काल प्रयागराजमध्ये न्यायालयीन प्रक्रिया पार पाडल्यानंतर सतीश भोसलेचा ताबा बीड पोलिसांना मिळाला आहे. बीड पोलीस भोसलेला ताब्यात घेऊन आज पहाटे छत्रपती संभाजीनगरच्या विमानतळावर दाखल झाले आहेत. पोलीस सतीश भोसले उर्फ खोक्याला बीडला घेऊन जातील, अशी माहिती आहे. काल रात्री खोक्याला प्रयागराजमधून महाराष्ट्रात आणलं गेलं आहे.

बीड पोलिसांनी सतीश भोसले उर्फ खोक्याला प्रयागराजमधून महाराष्ट्रात आणलं. युवकाला मारहाण केल्या प्रकरणी सतीश भोसले उर्फ खोक्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. खोक्याचे युवकाला मारहाण करतानाचे व्हिडिओ व्हायरल झाले होते. त्यानंतर सतीश भोसले उर्फ खोक्या फरार झाला होता. पोलिसांकडून त्याचा शोध सुरु करण्यात आला होता. मात्र, तो पोलिसांना सापडत नव्हता. खोक्या फरार झाल्यानंतर काही काळ पुण्यात देखील होता. त्यानंतर तो पुन्हा बीडला जाऊन नंतर प्रयागराजला गेला होता.

सतीश भोसले उर्फ खोक्याचं लोकेशन प्रयागराजमध्ये ट्रेस झाल्यानंतर त्याला बीड पोलिसांनी प्रयागराजच्या पोलिसांशी समन्वय साधून अटकेची कारवाई करण्यात आली. खोक्याला ट्रान्झिट रिमांड घेऊन महाराष्ट्रात आणलं गेलं आहे. बीड पोलीस खोक्याला घेऊन छत्रपती संभाजीनगरमधून बीडच्या दिशेनं रवाना झाले आहेत. आता खोक्याला शिरुरच्या कोर्टात हजर करण्यात येणार असल्याची माहिती आहे. आता पोलीस खोक्याला कोर्टात हजर करतील आणि पुढची प्रक्रिया पूर्ण केली जाईल, अशी माहिती आहे.

खोक्याची अटक रितसर दाखवण्यात येईल. त्यानंतर त्याची वैद्यकीय चाचणी करण्यात येईल, त्यानंतर त्याला न्यायालयात हजर केलं जाईल. खोक्या फरार झाल्यानंतर त्याला पकडण्याचं आव्हान होतं.

प्रयागराजमध्ये खोक्याला ताब्यात घेतल्यानंतर रात्री साडे बाराच्या सुमारास मुंबई विमानतळावर दाखल झाले. यानंतर त्याला छत्रपती संभाजीनगरच्या विमानतळावर आणण्यात आलं. शिरुर पोलीस ठाण्यात खोक्यावर गुन्हा असल्यानं तिथं त्याला हजर केलं जाईल. शिरुर पोलिसांकडे त्याला सोपवण्यात येईल. खोक्याच्या अटकेची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. त्यानंतर वैद्यकीय चाचणी केली जाईल. यानंतर दुपारच्या वेळी खोक्याला कोर्टात आणलं जाईल. त्यानंतर कोर्ट सतीश उर्फ खोक्याला किती दिवसांची कोठडी देतात हे पाहावं लागेल. खोक्यावर शिरुर कासार पोलीस स्टेशनला गुन्हा असल्यानं शिरुर कासार न्यायालयात हजर केलं जाईल.



### इंटरव्ह्यूनंतर पोलिसांचा धोका वाढला मग सतीश भोसलेने कुंभमेळ्याच्या पवित्र भूमीकडे प्रयाण केले

**■बीड :** बीड जिल्ह्यातील मारहाणीच्या गुन्ह्यांमधील फरार असलेला आरोपी सतीश भोसले उर्फ खोक्या भाई याला बुधवारी सकाळी उत्तर प्रदेशच्या प्रयागराज येथे बेड्या ठोकण्यात आल्या. बीड पोलीस आणि उत्तर प्रदेश पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. सतीश भोसले उर्फ खोक्या भाई प्रयागराज विमानतळावरुन पळण्याच्या तयारीत होता. तेव्हा पोलिसांनी खोक्या भाईच्या मुसक्या आवळल्या. काही दिवसांपूर्वी प्रयागराजमध्ये कुंभमेळा भरला होता. कुंभमेळ्यात प्रयागातील संगमावर शाही स्नान करण्यासाठी कोट्यवधी भाविक प्रयागराजमध्ये आले होते. त्याच प्रयागराजमध्ये पोलिसांनी खोक्या भाईला बेड्या ठोकल्या.

प्राथमिक माहितीनुसार, सतीश भोसले उर्फ खोक्या भाई सुरुवातीला बीड जिल्ह्यातच फिरत होता. मध्यंतरी त्याने एका मराठी वृत्तवाहिनीला सविस्तरपणे मुलाखत दिली होती. खोक्या भाई प्रसारमाध्यमांना मुलाखत देतो पण पोलिसांना त्याचा ठावठिकाणा लागत नाही, यावरुन बीड पोलिसांची कार्यक्षमता आणि विश्वासर्हेतवर प्रश्न उपस्थित झाले होते. त्यानंतर सतीश भोसले याच्या तपासाला वेग आला होता. महाराष्ट्रात आपल्याला असलेला धोका वाढला आहे, आपण पकडले जाऊ शकते, हे खोक्याच्या लक्षात आले. त्यामुळे खोक्याने बस पकडून तातडीने प्रयागराज गाठले. इतक्या दूर आपल्याला कोणीही पकडणार नाही, याची खोक्या भाईला खात्री असावी. तो प्रयागराजमधूनही निघण्याच्या तयारीत होता. त्यावेळी पोलिसांनी प्रयागराज विमानतळावर सतीश भोसले याला अटक केली.

खोक्या भाई गेल्या अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देत होता. बीड पोलिसांनी त्याला शोधण्यासाठी दोन पथके तैनात केली होती. मात्र, दिवसरात्र मेहनत घेऊनही खोक्या भाई पोलिसांना सापडत नव्हता. अखेर खोक्या वापरत असलेल्या मोबाईल फोनचे लोकेशन पोलिसांना मिळाले आणि तो अडकला. खोक्या भाईला पोलिसांनी पकडले असले तरी यामध्ये बीड पोलिसांपेक्षा उत्तर प्रदेशच्या पोलिसांचे योगदान अधिक असल्याची चर्चा रंगली आहे. खोक्याला सकाळी प्रयागराज पोलिसांच्या ताब्या ठेवण्यात आले होते. त्यानंतर बीड पोलिसांची पथक खोक्याला घेऊन बीडच्या दिशेने रवाना झाले आहे. सतीश भोसलेला घेऊन पोलीस आज रात्री किंवा उद्या सकाळी पोलीस ठाण्यात पोहोचतील, अशी शक्यता आहे.

## होळीनंतर राज्यात उन्हाचा तडाखा वाढणार

**■मुंबई। प्रतिनिधी :**

संपूर्ण भारतामध्ये हवामानबदलांना सुरुवात झाली असून, उत्तरेकडील हिमाचल प्रदेश आणि काश्मीरसारखी राज्य वगळता देशाच्या उर्वरित भागांमध्येही तापमानवाढीस सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रसुद्धा इथं अपवाद नाही. मध्य प्रदेशसह नजीकच्या भागातून उत्तर कोकणात येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे मुंबईला उष्णतेच्या लाटा तडाखा बसत आहे. मंगळवार आणि बुधवारी हीच स्थिती कायम राहून शहरातील तापमानाचा आकडा ३८ ते ३९ अंशांदरम्यान असल्याचं पाहायला मिळालं. पुढील २४ तासांमध्ये मुंबईचं हेच तापमान काही प्रमाणात किंचित फरकानं घसरण्याची शक्यता वर्तवमअयात येत आहे. तर, त्यानंतर अर्थात होलिका दहनानंतर मात्र तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. राज्यातील ठाणे, पालरघरसह कोकण किनारपट्टी क्षेत्रामध्ये हवेतील दमटपणा वाढल्यानं उष्मा अधिक भासू लागला आहे. तर, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात उष्णतेची लाट कायम आहे. राज्यात प्रामुख्यानं विदर्भात बहुतांश जिल्ह्यांत कमाल तापमान ४० अंशांपलिकडे पोहोचल्यानं हा उष्मा नेमका किती तापदायक आहे याचा अंदाज लावता येतोय. ही स्थिती पुढील कैक दिवस कायम राहील असंच हवामान विभागानं स्पष्ट केल्यामुळं नागरिकांच्या चिंतेत आता भर पडताना दिसणार आहे.

## बंद सुटकेसमध्ये आढळलं महिलेचं मुंडकं

**■बीडे। प्रतिनिधी :**

पालघरमधून धक्कादायक बातमी समोर आली आहे. या बातमीनं खळबळ उडाली आहे. पालघर जिल्ह्यातल्या विरारमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला आहे. विरार फाट्याच्या पिरकुंडा दर्गाजवळ एका ओसाड ठिकाणी महिलेचे सुटकेस मध्ये मुंडके आढळले आहे. तेथील स्थानिक मुलांनी ही सुटकेस उघडल्यावर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

दरम्यान घटनेची माहिती मिळताच मांडवी पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, पंचनामा सुरू आहे. प्राथमिक तपासानुसार, सदर महिला पश्चिम बंगालची रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, तिच्या शरीराचे इतर अवयव कुठे आहेत, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. होळीच्या दिवशीच हा प्रकार घडल्याने संपूर्ण परिसरात खळबळ माजली आहे. महिलेची हत्या करून तिच्या शरीराचे अवयव वेगवेगळे करून ते सुटकेसमध्ये घालून आरोपींनी त्याची विल्हेवाट लावल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

सध्या कलिना येथून फॉरेन्सिक तज्ज्ञांची टीम घटनास्थळी रवाना झाली असून, अधिक तपास सुरू आहे. मांडवी पोलीस या हत्येचा तपास करत असून, हा गुन्हा कोणी आणि कोणत्या कारणाने केला याचा शोध घेत आहेत.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, विरारमध्ये ही हादरवणारी घटना घडली आहे. विरार फाट्याच्या पिरकुंडा दर्गाजवळ स्थानिक मुलांना ही सुटकेस सापडली, त्यांनी उत्सुकतेपोटी ती उघडली असता त्यामध्ये महिलेचं धडावेगळं केलेलं मुंडकं आढळून आलं आहे. या घटनेमुळे त्यांनाही मोठा धक्का बसला. दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक तपासानुसार, सदर महिला पश्चिम बंगालची रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र अजूनही तिची पूर्ण ओळख समोर आलेली नाहीये. या महिलेची अत्यंत क्रूर अशा पद्धतीनं हत्या करण्यात आली आहे. तीचं मुंडकं पोलिसांना मिळालं आहे, आता इतर अवयव आरोपींनी कुठे टाकले याचा शोध पोलिसांकडून सुरू आहे. या घटनेनं शहरात खळबळ उडाली आहे. ही हत्या नेमकी का आणि कशासाठी करण्यात आली हे अद्याप अस्पष्ट आहे.




### भावाच्या हत्येचा बदला घेण्यासाठी सहा वर्ष वाट पाहिली
## सोलापूरात जे काही घडलं ते भयंकरच!

**■नाशिक। प्रतिनिधी :**

सोलापूरमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. भावाच्या हत्येचा बदला घेण्यासाठी एकाने तब्बल सहा वर्ष वाट पाहिले. त्यानंतर सहा वर्षांनी भावाच्या मारेकऱ्याचा बदला घेतला आहे. सोमवारी रात्री ११ वाजून ५० मिनिटांच्या सुमारास ही घटना घडली आहे. सोलापूर शहरातील जोशी गल्लीत एका तरुणाची हत्या झाल्याची घटना समोर आली आहे.

तुकाराम उर्फ रॉबट पांडुरंग सरवदे असं खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी आरोपी उत्तम प्रकाश सरवदे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. मयत तुकाराम उर्फ रॉबट पांडुरंग सरवदे याने 2019 मध्ये संशयित आरोपी उत्तम सरवदे याचा भाऊ सागर सरवदे याचा खून केला होता. त्याच खुनाचा राग मनात धरुन आरोपीने सरवदेची हत्या केली.

खूनाचा राग मनात धरून बदला घेण्याच्या उद्देशाने १० मार्चला रात्री यातील आरोपीने त्याच्या घरासमोर उत्तम सरवदे याला मारहाण करुन गंभीर जखमी केले. मयत तुकाराम सरवदे याला बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितली. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात झाली आहे.

हत्या झाल्यानंतर अवघ्या आठ तासात खून करणाऱ्या आरोपीच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. आठ तासांतच पोलिसांनी आरोपीचा शोध घेत त्याला अटक केली आहे. जोडभावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सुरू आहे.

### नाशिकमध्ये महिलेची प्रियकरासह आत्महत्या

प्रेमसंबंधांच्या विरोधात वारंवार दिल्या जाणाऱ्या धमक्यांना कंटाळून महिला आणि तिच्या प्रियकराने रेल्वेखाली झोकून देत आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना नाशिकच्या नांदगाव तालुक्यातील नस्तनपूर श्री.शनिदेव मंदिराजवळ घडली आहे. या प्रकरणी आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली १६ जणांविरुद्ध नांदगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, उज्ज्वला रामकृष्ण खताळ (रा. वंजारवाडी, ता. नांदगाव) हिचे तिच्या गावातील ज्ञानेश्वर माधव पवार याच्यासोबत प्रेमसंबंध होते. मात्र, गावातील काही लोकांनी त्यांच्या नात्याला विरोध करत त्यांना वारंवार आत्महत्या करा अन्यथा ठार मारू अशी धमकी दिल्याने त्या मानसिक छळाला कंटाळून दोघांनी आत्महत्येचा निर्णय घेतल्याचे आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये म्हटले आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# डिजिटल विद्यापीठ हवे, पण...

सध्या उच्च शिक्षणात जागतिक पातळीवर अभूतपूर्व वेगाने बदल होताना दिसत आहेत, हे मुख्यत्वे विद्यार्थ्यांच्या आणि जागतिक कार्यबलाच्या सतत बदलत्या गरजांशी जुळवून घेण्यासाठी होत आहे. त्यात आता डिजिटल विद्यापीठाचा उदय होत आहे. डिजिटल विद्यापीठ ही एक अशी शैक्षणिक संस्था आहे जी जीवनाच्या सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना लवचीक, सुलभ आणि उच्च गुणवत्तेचे शिक्षण देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करते. अशी विद्यापीठे इंटरनेट आणि त्याआधारित तंत्रज्ञानाद्वारे विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन अभ्यासक्रम प्रामुख्याने प्रदान करतात. काही डिजिटल विद्यापीठे अनेकदा ऑनलाइन आणि प्रत्यक्ष शिक्षण अशा दोन्ही पद्धतीने विद्यार्थ्यांना अध्यापन करतात. अशी विद्यापीठे विद्यार्थ्यांना जगभरातील शिक्षकांकडून शिकण्याची संधी देतात ज्यामुळे वैविध्यपूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षण वातावरण निर्माण होते. ही विद्यापीठे आजीवन शिक्षणाच्या संस्कृतीला प्रोत्साहन देतात आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या कारकीर्दीत त्यांची कौशल्य व ज्ञान सतत विकसित करण्यात प्रोत्साहित करतात. भारतात, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (२०२०) अनेक शैक्षणिक सुधारणा सुचवल्या आहेत; त्यात विद्यार्थ्यांना त्यांच्या दाराशी वैयक्तिकृत (पर्सनलाइज्ड) अनुभवांसह जागतिक दर्जाचे सार्वत्रिक शिक्षण प्रदान करणे, हीदेखील शैक्षणिक सुधारणा सुचविली आहे. त्यासाठी डिजिटल विद्यापीठाची स्थापना करणे हे जरुरीचे ठरते. त्या दृष्टीने भारतात 'नॅशनल डिजिटल विद्यापीठ' या पहिल्या डिजिटल विद्यापीठाची सुरुवात झाली. 'केरळ युनिव्हर्सिटी ऑफ डिजिटल सायन्सेस इनोव्हेशन अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी' हे भारतातील पहिले डिजिटल विद्यापीठ केरळ सरकारने २०२० मध्ये सुरूही केले. विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानव्य शास्त्रातील संशोधन आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करून देशातील ज्ञान क्रांतीचे प्रमुख प्रेरक बनणे हे या विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रातही विद्यार्थ्यांना लवचीक, आकर्षक व दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याचे योजिले आहे. आज इंटरनेट, स्मार्टफोन व इतर डिजिटल उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे ऑनलाइन शिक्षण देणे अधिक सुलभ झाले आहे हे खरे, तसेच विद्यार्थ्यांना लवचीक शिक्षण पर्यायाची गरज भासत आहे हेही खरेच. ही डिजिटल विद्यापीठे कधीही व कुठेही अभ्यास करण्याची लवचीकता प्रदान करतात; त्यामुळे काम करणाऱ्या व्यावसायिकांना किंवा पालकांना, गृहिणींना आणि दुर्गम भागात राहणाऱ्यांनाही शिक्षण घेणे सुलभ होऊ शकते. पारंपरिक विद्यापीठांतील शैक्षणिक शुल्कापेक्षा स्वस्त आणि परवडणारे शैक्षणिक कार्यक्रम ही विद्यापीठे देऊ शकतात. परंतु, डिजिटल विद्यापीठाबद्दल काही प्रश्न उपस्थित होत आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने ऑफलाइन व ऑनलाइन या दोन्ही प्रकारच्या पदवींना समान महत्त्व दिले तरी ऑनलाइन पदवी ही नियमित पदवीइतकीच उपयुक्त ठरणार आहे का? डिजिटल विद्यापीठाची पदवी प्राप्त करणाऱ्यांना कंपन्या किंवा अन्य प्रकारचे नियोक्ते नोकरी प्रदान करणार आहेत का? पारंपरिक शिक्षणात वर्गात विद्यार्थी व शिक्षकांची सुसंवाद व क्रियाकलाप, हे अध्यापन किंवा अध्ययन, ऑनलाइन शिक्षण पद्धतीपेक्षा अधिक प्रभावी करतात. तसेच विद्यापीठ अनुदान आयोग उच्च शिक्षणात, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तराचे प्रमाण १:२० वर असावे यासाठी आग्रही असताना ऑनलाइन पद्धतीत अमर्याद विद्यार्थी राहू शकतात, त्यामुळे विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष देणे कितपत शक्य होईल, याबाबतही शंका उपस्थित होते. तसेच दुर्गम भागात खराब इंटरनेट कनेक्टिव्हिटी हेदेखील डिजिटल विद्यापीठासाठी मोठे आव्हान ठरू शकते. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे 'मुक्त आणि दूरस्थ शिक्षण कार्यक्रम आणि ऑनलाइन कार्यक्रमा'ची नियमावली, दि. ४ सप्टेंबर २०२० रोजी अधिसूचित करण्यात आलेली आहे. या नियमांनुसार, 'उच्च शिक्षण संस्था म्हणजे प्रामुख्याने विद्यापीठेदेखील ; दूरस्थ शिक्षण/किंवा ऑनलाइन शैक्षणिक कार्यक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देऊ शकतात, जर ते समान शैक्षणिक कार्यक्रम पारंपरिक/ दूरस्थ शिक्षण मोडमध्ये चालवत असतील, आणि तेथून एक बॅच उत्तीर्ण झाली असेल.' याचा अर्थ असा की, राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे ऑनलाइन पद्धतीने पदवी कार्यक्रम राबवून शकतात. तर आता असाही प्रश्न निर्माण होऊ शकतो की मग नव्याने डिजिटल विद्यापीठ कशाला? महाराष्ट्र शासनाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे डिजिटल विद्यापीठात रूपांतर करण्याचे योजिले आहे, असे समजते. डिजिटल विद्यापीठाअंतर्गत विद्यार्थ्यांना उत्तम आणि चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील सर्व प्राध्यापकांना अध्यापनासाठी उच्च दर्जाचे ऑनलाइन प्रशिक्षण देण्याचा सरकारचा मानस आहे. या प्रशिक्षणामुळे ऑनलाइन वगार्तून विद्यार्थ्यांना प्रत्येक विषय सहज व सोप्या पद्धतीने शिकवणे प्राध्यापकांसाठी सहज शक्य होणार आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य सहज उपलब्ध व्हावे यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील सर्व पारंपरिक अभ्यासक्रमांचे रूपांतर संवादात्मक डिजिटल स्वरूपात करून देण्यात येणार आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील अभियांत्रिकी, स्थापत्यशास्त्र व तंत्रशिक्षणसंबंधीचे सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम घेण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाने मनाई केली आहे. आज या मुक्त विद्यापीठात ६८ शिक्षकांची पदे मंजूर आहेत, त्यापैकी आठ पदे ही विभागीय संचालकांसाठी राखीव आहेत. सद्या परिस्थितीत, विद्यापीठात काम करणाऱ्या मंजूर ६० शिक्षकांच्या पदांपैकी फक्त १९ जण कार्यरत आहेत व बाकीची ४१ पदे, म्हणजे ६८ टक्के पदे रिक्त आहेत. तसेच येथे मानव्य विद्या, वाणिज्य आणि व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, कृषी इत्यादी विद्याशाखांचे शिक्षक असल्याने यापैकी किती तंत्रस्नेही आहेत व ते डिजिटल विद्यापीठाच्या अनुषंगाने कितपत उपयुक्त ठरतील हा प्रश्नही येथे रास्त ठरतो.

# 'संकल्प' ठीक, गरज 'सिद्धी'कडे पाहण्याची

**अर्थसंकल्प म्हणजे नव्या आर्थिक वर्षाचा रोड मॅप असतो. म्हणूनच सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाइतकेच महत्त्व आधीच्या वर्षीच्या अर्थसंकल्पाला असते. आर्थिक वर्ष संपल्यानंतर त्या अर्थसंकल्पातून काय साध्य झाले, त्या अर्थसंकल्पाची फलनिष्पत्ती काय, याचा आढावा घेणे आवश्यक असते. अर्थसंकल्प हा केवळ सत्ताधारी पक्षाचा नसतो, तर संपूर्ण राज्याचा असतो. राज्यातील प्रत्येक व्यक्तीचे कररुपी योगदान त्यात असते.**



दरवर्षीप्रमाणे राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात मांडला गेला. सात लाख कोटींहून अधिक रकमेचा हा संकल्प आहे. १ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या नव्या आर्थिक वर्षात राज्य कोणत्या दिशेने मार्गक्रमण करेल हे अर्थसंकल्पावरून दिसत असते. कोणत्या प्रकल्पाला, विभागाला, जिल्ह्याला किती निधी मिळेल हे यात दिसते. पण आर्थिक वर्ष संपल्यानंतर त्या अर्थसंकल्पातून काय साध्य झाले याचा आढावा आवश्यक असतो. त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही.

अर्थसंकल्पाला विधिमंडळाची मान्यता घेणे संवैधानिक तरतुदीनुसार आवश्यक आहे. लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी त्यावर साधक-बाधक चर्चा, सूचना कराव्यात आणि त्या योग्य असतील तर सरकारने स्वीकाराव्यात ही झाली आदर्श लोकशाहीची लक्षणे. प्रत्यक्षात काय होते, हे सर्वजण पाहत असतातच. बहुमताच्या आधारे सर्व गोष्टी ठरतात. विरोधकांनी वेगळा सूर काढला तर तो स्वीकारला जाईलच याची खात्री नसते.

खरेतर अर्थसंकल्प केवळ सत्ताधारी पक्षाची मक्तेदारी असू शकत नाही. तो राज्याच्या संपूर्ण जनतेचा असतो, त्यासाठी त्यांनी कररुपाने, वेगवेगळ्या सरकारी शुल्काद्वारे योगदान दिलेले असते. सरकारी तिजोरीत प्रत्येक व्यक्ती काही ना काही योगदान देतच असते. अमुक एक गोष्ट विरोधकांनी सुचविली तर त्याला विरोध व्हायला नको. सरकार महसुलातून सहा लाख कोटी रुपये मिळवते. हा जनतेचा पैसा आहे. घटनाकारांनी सर्व गोष्टींचा एवढा सखोल विचार केला आहे की, एखादा पक्ष किंवा सदस्य सभागृहात अल्पसंख्येत असेल तरी त्याचा आवाज दाबला जाऊ नये म्हणून तीन वेगवेगळी आयुधे त्यांना दिलेली आहेत. एक तर अर्थसंकल्पावरील चर्चेला वेळेचे बंधन लागू करू नये, असा संकेत आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे साधी एक रुपयाची कपात सूचना एखाद्या सदस्याने मांडली तरी सरकारची धावपळ उडते. त्या सूचनेवर सरकारला समाधानकारक उत्तर द्यावे लागते. जनहिताच्या एखाद्या गोष्टीवर सरकार निधी देत नसेल, दुर्लक्ष करत असेल ही सूचना मांडताना सदस्याला बोलता येते.

पण गंमत अशी आहे की, एवढे प्रभावी शस्त्र उपलब्ध असतानाही आपल्या मतदारसंघासाठी विकासनिधी मिळावा म्हणून आपण पक्षांतर केले असे सांगत लोकशाही संकेत, आयुधे यांची चेष्टा केली जाते. एखाद्या मतदारसंघाचा, एखाद्या सदस्याचा विधिमंडळात संकोच झाला तर काय, याचा विचार घटनाकारांनी केला नाही, असे या पक्षांतर करणाऱ्यांना म्हणायचे आहे का?

यावर कडी म्हणजे आमच्या विरोधात मतदान ज्या ज्या गावांनी केले त्यांना निधी देणार नाही, ही भूमिका संविधानाच्या कोणत्या नियमात बसते हे विचारण्याची गरजही निर्माण होत आहे. 'हा देश जनतेच्या मालकीचा आहे, केवळ सत्ताधारी पक्षाचा नाही', हे वाक्य तसे छानच आहे, पण आपण लोकशाहीची मूलतत्त्वेच अजून शिकलेलो नाही, याचे हे द्योतक आहे. संविधानाने सर्व नागरिकांना समान अधिकार दिले आहेत. तसेच संसद, कार्यपालिका आणि न्यायपालिका या तीन स्तंभांवर लोकशाहीचा डोलारा उभा आहे. त्यात या तिघांना स्वतंत्र अधिकार आहेत. पण कार्यपालिकेने म्हणजे नोकरशाहीने आपले अधिकार बहुमत असलेल्या पक्षाच्या अधीन ठेवलेले असल्याने संसदीय लोकशाहीच्या या घटकाचे स्थान नेमके काय, हा चिंतनीय विषय आहे.

अर्थसंकल्पाची दुसरी महत्त्वाची बाजू अशी की गेल्या कित्येक वर्षांपासून एक प्रघात पडला आहे. तो म्हणजे अर्थसंकल्प मंजूर झाला की काही दिवसांतच त्यात कपात लागू करणे. गेल्या काही दशकांतील उदाहरणे पाहिली तर ३० टक्के कपात सर्रास लावलेली आढळून येईल. दुसरी पध्दत म्हणजे प्रत्येक अधिवेशनात भरमसाठ पुरवणी मागण्या सादर करून मूळ अर्थसंकल्पाचे स्थान गौण करणे.

हे सारे समजून घ्यायचे असेल तर कैक लाख कोटींच्या अर्थसंकल्पातून वर्षाअखेरीस काय हाती लागले याचा आढावा घेतला गेला पाहिजे. पण तो होत नाही. मागे विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार सत्तेवर असताना टाटा समाज विज्ञान संस्थेला काही विभागांच्या फलनिष्पत्ती अर्थसंकल्पावर काम करण्यास सांगण्यात आले होते. या संस्थेने काही विभागाच्या वार्षिक तरतुदींचा, प्रत्यक्षात वितरीत झालेल्या निधीचा व त्यातून काय साध्य झाले याचा अभ्यास करून राज्य सरकारला अहवाल सादर केले होते.

ते अहवाल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चेला आले आणि तिथूनच ते दप्तरी दाखल झाले. ते का झाले असावेत, हे समजण्यासाठी फार खोलात जाण्याची गरज नाही. ते अतिशय पथदर्शी असते तर विधिमंडळासमोर चर्चेला आलेच असते. पण तसे झाले नाही. आता फलनिष्पत्ती अर्थसंकल्पाबाबत धाडसी निर्णय होण्याची शक्यता दुरापास्त आहे.

खरे तर फलनिष्पत्ती अर्थसंकल्प म्हणजेच यातून काय साध्य झाले याबाबत चर्चा व्हायला हवी. सरत्या आर्थिक वर्षातील एकूण अर्थसंकल्पापैकी केवळ ४३ टक्के निधीच वितरीत झाल्याचे काही दिवसांपूर्वी निदर्शनाला आले होते. मंगळवारच्या आकडेवारीनुसार ही रक्कम ५६ टक्क्यांच्या आसपास आहे. ३१ मार्च रोजी चालू आर्थिक वर्ष संपत असताना ती फारतर ६० टक्क्यांवर जाईल. म्हणजे महाराष्ट्राचा राज्यशकट हाकण्यासाठी रुपयातले ६० पैसेच खर्च झालेले असतील. उर्वरित ४० पैसे आपण का खर्च शकलो नाही, यासाठीच तर आढावा घेणे आवश्यक ठरते.

आज महाराष्ट्रासमोर अनेक आव्हाने आहेत. सात लाख कोटींहून अधिक रकमेच्या अर्थसंकल्पातील केवळ ९३,१६५ कोटी रुपये विकास योजनांसाठी ठेवले गेले आहेत. १.७२ लाख कोटी रुपये सरकारी यंत्रणेच्या वेतनावर, ७५ हजार कोटी निवृत्ती वेतनावर आणि ६४ हजार कोटीहून अधिक रक्कम सरकारने घेतलेल्या कर्जाचे व्याज भरण्यासाठी खर्च होत आहे.

मागील वर्षीच्या आकडेवारीतील औत्सुक्याचा भाग म्हणजे २३,०१० कोटी रुपयांचे अर्थसंकल्पबाह्य कर्ज घेतले गेले आहे. हे कर्ज नेमके कशासाठी घेतले गेले याचा उलगडा झालेला नाही. तो होईलच याचीही हमी नाही. विधिमंडळाने मान्यता दिलेल्या अर्थसंकल्पाच्या बाहेर जाऊन सरते आर्थिक वर्ष निवडणुकांचे असताना अशी रक्कम कर्जाऊ का घ्यावी लागली हे स्पष्ट व्हायला हवे. ते विरोधी पक्ष विचारेल एवढी अपेक्षा ठेवणेच लोकांच्या हाती आहे.

सध्या आठ लाख कोटींच्या घरात गेलेले कर्ज पुढील वर्ष संपेल तेव्हा ९ लाख कोटींच्या बरेच पुढे गेलेले असेल. राज्यातील प्रत्येक व्यक्तीच्या डोक्यावर ८० हजार रुपयांचे कर्ज आहे, असे विधान परिषदेच्या विरोधी पक्ष नेत्यांनी म्हटले आहे. आपण जे कर्ज घेतोय ते कशासाठी आणि त्याचा नेमका विनियोग काय, यावर कधी चर्चा होत नाही. कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी त्यात फरक पडत नाही.

सध्या विरोधी पक्षाची स्थितीही फारशी ठीक दिसत नाही. अधिवेशनाच्या कामकाजाचे दोन आठवडे पूर्ण होत असताना शिवसेना विरोधी पक्षनेतेपदाच्या घोषणेच्या प्रतीक्षेत आहे, तर काँग्रेस पक्ष लोकलेखा समितीच्या अध्यक्षपदाकडे डोळे लावून बसला आहे. राज्यात उलथापालथ घडवून आलेले अनेक वादग्रस्त विषय चर्चेत येणे बाकी आहे. ते २६ मार्च या अधिवेशनाच्या अखेरच्या दिवसापर्यंत येतील अशी आशा करणेच लोकांच्या हाती आहे.

# सांघिक कामगिरीचे यश

भारतीय संघाने न्यूझीलंडला पराभूत करून चॅम्पियन्स ट्रॉफी वन-डे क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आणि देशभरात एकच जल्लोष साजरा करण्यात आला. गेल्या वर्षी टी-२० वर्ल्ड कप जिंकल्यानंतर कर्णधार रोहित शर्माने चॅम्पियन्स ट्रॉफीही भारतात आणणार, असा शब्द दिला होता. यासाठी गेल्या काही महिन्यांपासून भारतीय संघ मेहनत घेत होता. एक संघ म्हणून भारतीय संघाने इतर संघाच्या तुलनेत सरस कामगिरी केली, यात वादच नाही. आता भलेही काही जण भारतीय संघाला दुबईतच खेळण्याचा फायदा झाला, भारतीय संघ चार फिरकी गोलंदाजांसह खेळला, अशी टीका करीत असले, तरी नाणेफेक गमावूनही केवळ संघाच्या जमेच्या बाजूंवर भारतीय संघाने विजय मिळवले, ही बाब ऑस्ट्रेलियाचा कर्णधार स्टीव्ह स्मिथ आणि न्यूझीलंडला कर्णधार मिचेल सँटनरनेही मान्य केली. भारतीय पुरुष संघाने मागील तीन आयसीसी स्पर्धांमध्ये मिळून २४ पैकी २३ सामने जिंकले. यावरून भारतीय संघाचे निर्विवाद वर्चस्व अधोरेखित होते. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारताने बांगलादेश, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड यांच्यावर सफाईदार विजय मिळवले. विशेष म्हणजे भारतीय संघ केवळ एकाच खेळाडूवर अवलंबून नव्हता. जेव्हा संघ एकाच खेळाडूवर अवलंबून नसतो, तेव्हा त्या संघाला पराभूत करणे सोपे नसते. या संघात भारताची फलंदाजी आठव्या क्रमांकापर्यंत होती. चार फिरकी गोलंदाजांनी प्रतिस्पर्ध्यांना दुबईच्या संथ खेळपट्ट्यांवर डोके वर काढण्याची संधीच दिली नाही. विराट कोहली, शुभमन गिलची शतके, रोहित शर्माची अंतिम सामन्यातील निर्णायक अर्धशतक, मधल्या फळीत श्रेयस अय्यरने कामगिरीत राखलेले सातत्य, अष्टपैलू म्हणून अक्षर पटेलने सोडलेली छाप, महंमद शमी, वरुण चक्रवतीने प्रतिस्पर्धीचा निम्मा संघ गारद करण्याची केलेली किमया, लोकेश राहुल, हार्दिक पंड्या, कुलदीप यादव, रवींद्र जडेजा यांनी मोक्याच्या क्षणी दिलेले योगदान हेच भारतीय संघाच्या यशाचे गमक आहे. आता भारतीय पुरुष संघ आयसीसी स्पर्धा (तीन चॅम्पियन्स ट्रॉफी, दोन वन-डे वर्ल्ड कप, दोन टी-२० वर्ल्ड कप) सातव्यांदा जिंकून सातवे आसमाँपर आहे.

# बांगलादेश अस्थिरतेकडेच चालला आहे...

बांगलादेशात लोकांच्या उठावाने शेख हसीना यांचे सरकार हटवले आणि मोहम्मद युनूस यांनी हंगामी सरकारचे प्रमुख सल्लागार म्हणून शपथ घेतली, या घटनाक्रमाला सात महिने पूर्ण झालेले असतानाही बांगलादेशात अस्थैर्यच दिसते आहे. एकंदर कायद्यांची ऐशीतैशी, अद्यापही होत राहिलेला हिंसाचार आणि रसातळाला चाललेली अर्थव्यवस्था ही सारी चिन्हे पाहून 'आगीतून फुफाट्यात' अशी आपल्या या शेजारी देशाची स्थिती अटळ असल्याचे लक्षात येते. युनूस हे स्वतःला ह्यप्रमुख सल्लागारह्न म्हणवत असले आणि लष्कराच्या हातात खरी सत्ता असली, तरी अंतर्गत हिंसाचार शमवून देशाचे गाडे रुळांवर आणण्याची जबाबदारी युनूस यांचीच आहे. झुंडशाहीला आळा घालण्यात युनूस यांना आलेले अपयश उघड दिसते. 'हिज्ब-उर- तहरीर' सारख्या संघटनेवर बंदी घालण्यात आली असली तरी या संघटनेचा हिंसाचार भररस्त्यांत सुरूच आहे. युनूस यांच्या 'सल्लागार मंडळा'त गृह खात्याचे काम पाहाणारा तरुणच या संघटनेचा कार्यकर्ता आहे म्हणतात. या संघटनेला इतर इस्लामी आक्रस्ताळ्या संघटनांची साथ आहेच. या देशात गृह खाते सांभाळणाऱ्या महफूज आलमने डिसेंबरमध्ये 'पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतातल्या राज्यांचा काही भाग बांगलादेशाला जोडावा...' अशा अर्थाचा मजकूर समाजमाध्यमांवर लिहिला आणि मग, भारताने आक्षेप नोंदवल्यावर तो स्वतःच काढून टाकला; पण मधल्या काळात आपणच कसे खरे बांगलादेशी राष्ट्रवादी, हे तेथील लोकांना दाखवण्याचा त्याचा हेतू साध्य झाला. ज्या विद्यार्थ्यांनी इथल्या असंतोषाला पहिल्यांदा वाचा फोडली होती, त्यांनी आता 'जातीयो नागोरिक पार्टी' (बंगाली भाषेत जातीयो म्हणजे सार्वत्रिक, राष्ट्रीय या अर्थाने) स्थापन केली आहे आणि तिचे काम करण्यासाठी युनूस यांच्या सल्लागार-सहकाऱ्यांपैकी एका सहकाऱ्या या सत्ताधारी मंडळाचा राजीनामा अलीकडे दिलेला आहे. या पक्षाचे ध्येय म्हणजे नवीन संविधान स्वीकारणे आणि 'संवैधानिक हुकूमशाही' विरुद्ध भक्कम लढा उभारणे. प्रशासनाच्या राजकीय चौकटीला आकार देण्याचे आणि नवीन बांगलादेश बांधण्याचे त्यांचे वचन हे राजकीय भाषणबाजीत आणखी एक भर घालणारे आहे. युनूस यांनी या पक्षाला चालना देण्यात भूमिका बजावल्याचे वृत्त आहे. अशांततेतून जन्मलेल्या अशा पक्षांना यश मिळू शकले नाही, याचा इतिहास साक्षीदार आहे.

युनूस हे काही लोकप्रियतेच्या लाटेवरचे नेते नाहीत. त्यांना राष्ट्रीय सरकारचे नेतृत्व करण्याचा अनुभवही नाही; पण २००६ मध्ये (बांगलादेशात 'ग्रामीण बँके'मार्फत सूक्ष्मबचतीचा योग्यरीत्या प्रसार केल्याबद्दल) नोबेल शांतता पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांनी राजकीय महत्त्वाकांक्षा जोपासल्या आहेत, हे सर्वज्ञात आहे. युनूस यांनी २००७ मध्ये, लष्कराच्या पाठिंब्याने काम करणाऱ्या काळजीवाहू सरकारच्या काळात, 'प्रामाणिक राजकारण्यांना आकर्षित करण्यासाठी' आणि 'बांगलादेशच्या राजकीय संस्कृतीत सुधारणा करण्यासाठी' अशी उद्दिष्टे ठेवून 'नागरिक शक्ती' हा राजकीय पक्ष स्थापन केला होता. पण फारसा पाठिंबा न मिळाल्याने हा पक्ष बंद पडला. २००७-२०१० पर्यंत भारताचे उच्चायुक्त म्हणून मला लष्कराच्या पाठिंब्याने काम करणाऱ्या काळजीवाहू सरकारशी संवाद साधावा लागला. मी युनूस यांना काही वेळा भेटलो आणि त्यांच्या राजकीय पक्षाबद्दल विचारपूस केली. त्यांना खात्री होती की बांगलादेशला एक नवीन, प्रामाणिक राजकीय संस्कृतीची आवश्यकता आहे, आणि 'भ्रष्ट' मुख्य प्रवाहातील पक्ष हे काम करण्यास असमर्थ आहेत. परंतु आज 'सरकारच्या सल्लागार मंडळा'चे प्रमुख म्हणून, युनूस हिंसाचार रोखण्यात अपयशी ठरले आहेत.

हिंसाचाराला 'वैध' म्हणून झुंडशाहीची भलामण केल्याबद्दल आणि अल्पसंख्याक-विरोधी हिंसाचार हा 'सांप्रदायिक' नसून 'राजकीय' आहे, असा विचित्र युक्तिवाद केल्याबद्दल युनूस यांच्यावर टीका झाली आहे. इस्लामवाद्यांना सरकारी यंत्रणांना संस्थांवर कब्जा करण्यासाठी आणि शेख हसीना सरकारच्या नियुक्त्या निष्प्रभ करण्यासाठी युनूस यांनीच मोकळीक दिल्याचा आरोप त्यांचे विरोध करू लागले आहेत. वाढत्या महागाईशी झुंजणाऱ्या बांगलादेशी लोकांमध्ये हलाखीच्या आर्थिक परिस्थितीमुळे निराशा वाढली आहे. हिंसाचारामुळे शेकडो कारखाने बंद पडले आहेत, गुंतवणूक कमी झाली आहे, कर्जवितरणाचे प्रमाण कमी झाले आहे आणि रोजगारसंधी रोडावल्याच आहेत. युनूस यांच्या नेतृत्वाखालील सल्लागार मंडळाने सत्तांतराला 'क्रांती' आणि 'नवीन मुक्ती' वगैरे कितीही म्हटले तरी, या तथाकथित शब्दांचा बुडबुडा आता फुटू लागला आहे. लोकांचा संयम सुटत चालला आहे.अशा वेळी अलीकडेच जाहीर निवेदन करून बांगलादेशच्या लष्करप्रमुखांनी इशारा दिला की अंतर्गत संघर्ष आणि हिंसाचार थांबला पाहिजे, कारण त्यामुळे देशाच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण झाला आहे. बांगलादेश मुक्तीलढ्याचे महत्त्वाचे नेते 'वंगबंधू' शेख मुजीब-उर रहमान यांचे ढाका येथील घर हे ऐतिहासिक स्मारक; पण झुंडीने हे स्मारक गेल्या महिन्यात उद्ध्वस्त केले, त्यानंतर लष्करप्रमुखांनी हा इशारा दिला. या स्मारकाच्या दिशेने चाल करून येणारे बुलडोझर थांबवण्यात 'सल्लागार मंडळ' अयशस्वी झाले. युनूस हे गेल्या सात महिन्यांत असल्या भयानक कृत्यांना 'अनावर रागाचा नैसर्गिक उद्रेक' ठरवत होते, तशाच शब्दांत याही उद्ध्वस्तीकरणाला ते समर्थन देत असल्याचे दिसून आले. यावर लष्करप्रमुखांनी 'आम्ही इशाराच दिला नव्हता असे नंतर कोणीही म्हणू नये' इतक्या स्पष्ट शब्दांत बजावले आणि लवकर निवडणुका घेण्याचे समर्थन केले.

मात्र विद्यार्थी नेत्यांना लवकर निवडणूक नको आहे. निवडणुकीत आपणच विजयी होऊ आणि दीर्घकाळ सत्ता टिकवून ठेवू, इतकी खात्री होईपर्यंत या तरुण नेत्यांना वेळ हवा आहे. अर्थात हे उघडपणे न सांगता विद्यार्थी नेत्यांनी, ह्यनिवडणूक प्रणाली आणि प्रशासनातील सुधारणांना वेळ लागेलह्न अशी सबब वारंवार पुढे केली आहे. अशा वेळी लष्कराला त्यांच्या प्रतिमेबद्दल आणि देश अनेक आव्हानांना तोंड देत असताना ते कुचकामी ठरल्याचा संदेश जगभर जाईल, याबद्दल काळजी वाटते.देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय दबाव विविध दिशांनी वाढल्याचा परिणाम असा की, 'डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान निवडणुका होतील,' अशी घोषणा युनूस यांनी गेल्या आठवड्यात केली. म्हणजे हसीना यांना देशोधडीला लावल्यानंतर १७ ते २० महिन्यांनी! त्यातही तारखांची निश्चिती नाहीच. 'कामात विलंब' हाच प्राधान्याचा धोरणात्मक पर्याय असल्याचे या अशा मोघम घोषणांतून दिसून येते. 'युनूस यांचे जवळचे मित्र' अशी ओळख असणारे भारतीय नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनीसुद्धा बांगलादेशातील अशांततेबद्दल जाहीरपणे चिंता व्यक्त केलेली आहे. सेन यांच्या कुटुंबाचे मूळ गाव पूर्व बंगालमध्ये आहे. 'युनूस यांचे प्रयत्न प्रामाणिक आहेत,' असे सेन मानतात; पण अवामी लीगवर (शेख हसीनांच्या पक्षावर) बंदी घालणे लोकशाहीविरोधीच ठरेल, असे स्पष्ट मतही सेन यांनी मुखर केले आहे. विद्यार्थी नेते बांगलादेशच्या स्थितीसाठी एकट्या अवामी लीग पक्षाला जबाबदार धरून त्यावर बंदी लादण्याच्या प्रयत्नात आहेत, हे लपून राहिलेले नाहीच. देशाची दुर्दशा अशी कोणत्याही एकाच पक्षामुळे होत नसते, हे सर्वांना कळते; त्यामुळेच बांगलादेशी तरुण नेत्यांनी दिलेले हे कारण वरवरचेच असावे आणि खरा उद्देश सर्वात जुन्या आणि मजबूत राजकीय पक्षाचा काटा काढून, स्वतः सत्ताधारी होण्याचा मार्ग निष्कंटक करावा असाच असणार, असे मानायला जागा आहे. मात्र राजकीय पक्षांकडून आणि अन्य संघटनांकडून अवामी लीगवरील बंदीला विरोध झाल्याने सध्यातरी ते झालेले नाही. तरीही यातून हे स्पष्ट झाले की अवामी लीग किंवा बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) हे दोन्ही पक्ष तरुण/विद्यार्थ्यांनी स्थापलेल्या 'जातीयो नागोरिक पार्टी'शी निवडणूक-पूर्व समझोता करणार नाहीत.

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी आणि इतरही अनेक राजकीय पक्षांनी लवकर निवडणुका घेण्याच्या मागणीसाठी जोरदारपणे पुढाकार घेतला आहे, त्यामुळे युनूस राजवटीला आव्हान मिळाले असले तरी 'जमात-ए इस्लामी (बांगलादेश)' आणि 'हिफाजत-ए-इस्लाम' यांनी लवकर निवडणूक नको, असे स्पष्टपणे म्हटले असून त्याऐवजी स्थानिक निवडणुका आधी घेण्याचा सल्ला दिला आहे. या कट्टरपंथी इस्लामी संघटना बांगलादेशला शरियतवादी इस्लामिक राज्य बनवण्याच्या त्यांच्या अजेंड्यावर लक्ष केंद्रित करत आहेत. भारताच्या बांगलादेश-विषयक धोरणासाठी हा एक प्रमुख मुद्दा ठरतो. द्वेष आणि भाषणबाजीने संबंध वाढत नसतात, हे बांगलादेशाची धुरा सध्या सांभाळणाऱ्यांनीही लक्षात घेतले पाहिजे आणि भूराजनीती आणि भू-अर्थशास्त्राच्या वास्तवाकडे डोळे उघडून पाहिले पाहिजे.ही गरज सध्या बांगलादेशी धोरणकर्त्यांना जाणवत असावी. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेत पदभार स्वीकारल्यानंतर अमेरिकेचे बांगलादेशशी असलेले समीकरण बदलले आहे की नाही हे स्पष्ट नाही. पण 'निवडणूक घेऊ' एवढे युनूस म्हणाले, हेसुद्धा भाषणबाजी थांबून वास्तववादी पातळीवर खाली आल्याचे लक्षण ठरते.

भारताने बांगलादेशींना देण्यात येणाऱ्या व्हिसांची संख्या कमी केल्यामुळे बांगलादेशमध्ये संताप वाढत आहे. युनूस यांच्या नेतृत्वाखालील सल्लागार मंडळाकडेच या रागाचा रोख आहे. हजारो बांगलादेशी वैद्यकीय उपचार आणि पर्यटनासाठी भारतात येतात. संयुक्त राष्ट्रांनी रोहिंग्यांना देण्यात येणारी अन्न मदत अर्ध्यावर आणल्याने बांगलादेशावर, दहा लाखांहून अधिक रोहिंग्या निर्वासितांच्या देखभालीसाठी आर्थिक दबाव वाढत आहे. अशा परिस्थितीत युनूस आणि बांगलादेशाचे परराष्ट्र सल्लागार या दोघांनीही एकीकडे भारताशी चांगल्या संबंधांना पाठिंबा दर्शविला आहे, तर दुसरीकडे त्यांनी पाकिस्तानशी संबंधही सुधारले आहेत. बांगलादेशातील इस्लामी कट्टरतावादी त्यांचा 'बिछडा हुआ भाई' पाकिस्तानला आलिंगन देण्यास उत्सुक आहेत. चीनसुद्धा बांगलादेशात हातपाय पसरू पाहातो, यातून भारताला रोखण्याचे त्यांचे धोरण काय आहे हेही दिसून येते. शेजाऱ्यांविषयी भारताचे धोरण नेहमीच आव्हानांनी ग्रासलेले राहिले आहे. त्यामुळे ही आव्हाने नवीन नाहीत, परंतु ती भारताच्या सुरक्षेवर परिणाम करतात आणि तसे होणे बांगलादेशसाठीही बरे ठरणार नाही, हे ओळखून बांगलादेशानेही सावधगिरी बाळगली पाहिजे.

# तटबंदीला सायबर छेद

दिवसागणिक सायबर गुन्ह्यांची संख्या वाढते आहे. राज्यात ५० सायबर पोलिस ठाणी कार्यान्वित असतानाही मागील वर्षभरात एकट्या महाराष्ट्रात दाखल झालेल्या आठ हजार ९४७ गुन्ह्यांची नोंद लक्षात घेतली तर हा चक्रव्यूह किती फैलावतो आहे याची कल्पना येते. या गुन्ह्यांतर्गत फसवणूक झालेला आकडा तब्बल सात हजार ६३४ कोटी २५ लाख इतका आहे.

एकीकडे अंतराळ संशोधनापासून हवामान अंदाजापर्यंतचे संदर्भ चुटकीसरशी हाती लागत असल्याचा आनंद आधुनिक तंत्रज्ञानाने सामान्यांपर्यंत नेऊन ठेवला असताना अभ्यासू वृत्तीवर वरवंटा फिरविणारे महाभागही याच जगात असल्याचे दिसते. ही आकडेवारी विधानसभेतील तारांकित प्रश्नाच्या उत्तरात पुढे आली. मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात मुंबई, ठाणे, नागपूर आणि पुणे येथील आकडेवारी दिली. मागील वर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायबर गुन्हे तज्ज्ञांच्या संशोधनात अशा गुन्ह्यांच्या संदर्भात भारत १०० देशांमध्ये दहाव्या स्थानावर असल्याचे सिद्ध झाले होते.

सायबरतज्ज्ञांनी जाहीर केलेल्या 'सायबर क्राइम इन्डेक्स'मध्ये रशिया, युक्रेन, चीन असा देशांचा क्रम आहे. 'मालवेअर कोडिंग'पासून 'सिस्टीम हॅकिंग'पर्यंत आणि क्रेडिट कार्ड गैरप्रकारांपासून आभासी चलनांपर्यंतच्या विविध मार्गांनी सामान्यजनांना आपल्या विळख्यात ओढण्याचे काम जगभरात सर्रास सुरू असल्याचे लक्षात आले आहे. पोलिसांचे हात सायबर गुन्हेगारांपर्यंत पोहचण्यात कुचकामी ठरत असल्याचे यावरून सिद्ध होते. अनेकदा विदेशातून ठरावीक ठिकाणाहून फोन येतात. त्या फोन क्रमांकांपर्यंत पोहचण्यात यंत्रणा सक्षम नसल्याचे शल्य पोलिस विभागातूनच व्यक्त होते.

गुन्ह्यांच्या विश्लेषणासाठी पुण्यात 'सेंटर ऑफ एक्स्लन्स इन डीजिटल फॉरेन्सिक' सुरू झाले ही समाधानाची बाब असली तरी ग्रामीण पातळीवर आयुष्याच्या कमाईवर सराईतपणे डल्ला मारणाऱ्यांवरील कारवाई वाढणार नाही तोपर्यंत सामान्यांच्या डोक्यावरील टांगती तलवार कायम असेल. ती दूर होणे गरजेचे आहे. याबाबत महाराष्ट्रव्यापी संरक्षक कवच लवकरच तयार होणार आहे, ही मुख्यमंत्र्यांनी दिलेली ग्वाही दिलासादायक आहे, मात्र आपल्या संरक्षकांपेक्षा सायबर चौर्यकर्म करणारी मंडळी अतिशय चलाख असल्याची जी भावना सामान्यांमध्ये दृढ झाली आहे, ती घातक व भयकारक आहे. या भीतीतून बाहेर पडण्यासाठी पोलिसांसोबत नागरिकांची संवादसत्रे घेता आली तर कारवाईचा विश्वास वाढेल. आर्थिक तटबंदीच्या कोसळत्या बुरूजांची दहशत संपण्यासाठी पोलिसांना त्वरेने पुढाकार घ्यावा लागेल.





# होळी

**होळी हा हिंदू धर्मांचा प्रमुख सण आहे. वसंत ऋतूचा महिना येताच त्याची प्रतीक्षा सुरू होते. होलिका दहन हा सण फाल्गुन शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेच्या रात्री केला जाण्याची परंपरा आहे. दुसऱ्या दिवशी होळी साजरी केली जाते. हिंदू धर्मानुसार होलिका दहन हा सण वाईटावर विजय मिळवण्याचे प्रतीक मानले जाते. होळी हा सांस्कृतिक, पारंपारिक आणि धार्मिक सण आहे. या सणाचा उत्साह हा वेगवेगळ्या पद्धतीने देशभरात पाहायला मिळतो. होळी हा सण परस्पर प्रेम, बंधुभाव आणि सद्भावनेचा सण देखील मानला जातो. या दिवशी लोक एकमेकांना रंगात भिजवतात. घरोघरी गुढ्या आणि पदार्थ तयार केले जातात. या दिवशी लोक एकमेकांच्या घरी जाऊन रंग लावतात व तसेच होळीच्या शुभेच्छा देखील देतात. अशा परिस्थितीत यावर्षी होळीची नेमकी तारीख आणि शुभ मुहूर्त काय आहे जाणून घेऊयात**

### होळी सणामागील उद्देश

दृष्ट प्रवृत्ती, वाईट, अमंगल विचार यांचा नाश करुन चांगली वृत्ती, चांगले विचार अंगी बाळगावे, हा या सणाम ागील उद्धेश. होळीनिमित्त पुरळपोळी, रंग, धुडवड या सगळ्याचे आकर्षण तर असतेच.

### होळीची कहाणी

जसे प्रत्येक सणाची कहाणी आहे तसेच, होळी साजरी करण्या मागे देखील एक प्राचीन इतिहास आहे. हिरण्यकश्यपू नावाचा एक राजा होता जो स्वतःला खूप बलवान समजायचा. स्वतःच्या अहंकारामुळे तो देवतांची घृणा करायचा तसेच त्याला देवांचा देव भगवान विष्णूचे नाव ऐकणे देखील पसंत नव्हते. परंतु त्याचा पुत्र प्रल्हाद हा भगवान विष्णू चा परम भक्त होता. आणि हे हिरण्यकश्यपूला अजिबात पसंत नव्हते. तो वेगवेगळ्या प्रकारे त्याला घाबरवण्याचा प्रयत्न करत असे जेणे करून पुत्र प्रह्लाद भगवान विष्णूची उपासना करणे सोडून देईल. परंतु भक्त प्रह्लाद त्यांना न डगमगता त्याच्या भगवान विष्णूच्या भक्तीत लीन होत असे. ह्या सगळ्याला कंटाळून राजाने एक योजना बनवली, आणि त्यानुसार आपली बहीण होलिका जिला वरदान मिळाले होते कि ती आगीवर विजय प्राप्त करू शकते तसेच कोणतीही आग तिला जाळू शकत नाही. राजाने होलिकेला भक्त प्रह्लादला घेऊन अग्नीच्या चितेवर बसण्यास सांगितले. प्रह्लाद आपल्या आत्यासोबत अग्नीच्या चितेवर बसला व भगवान विष्णूच्या नामस्म रणात लीन झाला आणि थोड्याच वेळात होलिका जळायला लागली आणि एक आकाशवाणी झाली आणि ज्यानुसार होलिकेला आठवलं की, तिला वरदानात असेही सांगितले होते कि ज्यावेळी ती तिच्या वरदानाचा दुरुपयोग करेल तेव्हा ती स्वतः जळून राख होईल. भक्त प्रह्लादाला अग्नी काहीही करू शकला नाही मात्र होलिका त्या अग्नीत जळून भस्म झाली. अशा प्रकारे त्या दिवशी लोकांनी उत्सव साजरा केला आणि तो दिवस होळी दहन म्हणून ओळखला जाऊ लागला. दुसऱ्या दिवशी रंगाने हा सण उत्सवात साजरा करू लागले.

### पौर्णिमा तारीख :

फाल्गुन पौर्णिमेला होलिका दहन आणि दुसऱ्या दिवशी होळी साजरी करण्याची पद्धत आहे. यावर्षी फाल्गुन पौर्णिमा तिथी २४ मार्च रोजी सकाळी ०९:५४ वाजता सुरू होईल. ही तारीख दुसऱ्या दिवशी म्हणजेच २५ मार्च रोजी दुपारी १२:२९ वाजता संपेल.

२४ मार्च रोजी होलिका दहन आहे. या दिवशी होलिका दहनाचा शुभ मुहूर्त ११:१३ ते १२:२७ पर्यंत असल्याचे सांगितले जात आहे. अशा परिस्थितीत, तुम्हाला होलिका दहनासाठी एकूण १ तास १४ मिनिटे वेळ आहे.

### होळी २०२४ कधी आहे? :

होलिकेच्या दुसऱ्या दिवशी होळी हा सण साजरा केला जातो. म्हणून यावर्षी होळी २५ मार्च रोजी साजरी होणार आहे. या दिवशी देशभरात मोठ्या थाटामाटात होळी हा सण साजरा केला जाणार आहे..

### होलिका दहन पूजेची पद्धत :

- होलिका दहनाची पूजा करण्यासाठी सर्वात प्रथम स्वच्छ स्नान करावे.
- आंघोळीनंतर होलिकेच्या पूजेच्या ठिकाणी उत्तर किंवा पूर्वेकडे तोंड करून बसावे.
- तसेच पूजेसाठी गाईच्या शेणापासून होलिका आणि प्रल्हादाच्या मूर्ती बनवाव्या लागतात.
- पूजा साहित्यासाठी रोळी, फुले, फुलांच्या माळा, कच्चा कापूस, गूळ, अख्खी हळद, मूग, बताशा, नारळाचा – गुलाल, ५ ते ७ प्रकारची धान्ये आणि पाणी एका भांड्यात ठेवावे.
- यानंतर सर्व पूजापद्धतीने साहित्यासह पूजा करावी. तसेच मिठाई आणि फळे अर्पण करावे.
- होलिकेची पूजा करण्यासोबतच विधीनुसार भगवान नरसिंहाची पूजा करावी. तसेच होलिकेभोवती सात वेळा प्रदक्षिणा घालावी.

होलिका दहन पूजा पद्धत काय आहे : होळी पेटवण्यापूर्वी होलिकेची पूजा करण्याची परंपरा आहे. यासाठी व्यक्तीने होलिकाची पूजा करताना पूर्व किंवा उत्तरेकडे तोंड करून बसावे. पूजेसाठी हार, फुले, कच्चा कापूस, गूळ, रोळी, सुगंध, अख्खी हळद, मूग, बताशा, गुलाल, नारळ, पाच प्रकारची धान्ये, गव्हाचे कान आणि एक भांडे पाणी ठेवावे. त्यानंतर होलिकेभोवती प्रदक्षिणा घालावी. दुसऱ्या दिवशी होळीची राख आणून चांदीच्या पेटीत ठेवावी.

लोक होलिकेच्या पवित्र अग्निमध्ये जवाचे दाणे आणि मोहरीचे मलम शरीरावर लावतात. असे केल्याने घरात सुख-समृद्धी येते असे म्हणतात. भद्रामध्ये होलिका दहन कधीच होत नाही. होळीच्या दुसऱ्या दिवशी मातंग योगात धुलेंडीचा सण साजरा केला जाणार आहे. पूर्वा फागुनी आणि उत्तरा फागुनी नक्षत्र या दोन्ही दिवशी अनुक्रमे पडत आहेत. होळी हा स्थिर योगामुळे एक शुभ सण मानला जातो.

### होलिका दहनाचे महत्त्व :

ज्योतिषी आणि हस्तरेखा अभ्यासक पंडित विनोद सोनी पौद्दार म्हणतात की लोक होळी आणि होलिका दहनाची तयारी महिनाभर आधीच सुरू करतात. होलिका दहन केल्याने घरात सुख, शांती आणि समृद्धी नांदते. स्त्रिया या दिवशी अपत्यप्राप्तीसाठी पूजा करतात. पूजेसाठी काटेरी झुडपे आणि लाकडे गोळा केली जातात. त्यानंतर होळीच्या एक दिवस आधी एका शुभ मुहूर्तावर होलिका दहन केले जाते.

### होलाष्टक कधी सुरु होतो?

होळीच्या आठ दिवस आधी होळाष्टक सुरू होते. या काळात शुभ आणि शुभ कार्ये वर्ज्य आहेत. पंचांगानुसार, शुक्ल पक्षातील अष्टमी तिथी १६ मार्च रोजी रात्री ९:३९ वाजता सुरू होईल आणि १७ मार्च रोजी सकाळी ९:५३ वाजता समाप्त होईल. अशा परिस्थितीत १७ मार्चपासून होलाष्टक सुरू होऊन २४ मार्चला संपेल.

## होळीला पुरणपोळी का बनवतात?



पुरण पोळी ही भारतीय उपखंडात विशेषतः महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक या पश्चिमेकडील राज्यांमध्ये लोकप्रिय असलेली गोड पोळी आहे. ही एक पारंपरिक डिश आहे जी सामान्यतः सण आणि विशेष प्रसंगी बनविली जाते. पुरण पोळीचा उगम प्राचीन काळापासून शोधला जाऊ शकतो आणि त्याची उत्क्रांती भारतीय संस्कृतीत खोलवर रुजलेली आहे.

पुरण पोळीतील पुरण हा शब्द संस्कृत शब्द पुराण पासून आला आहे, ज्याचा अर्थ प्राचीन किंवा जुना असा होतो. वेद आणि महाभारतासह अनेक प्राचीन भारतीय ग्रंथ आणि धर्मग्रंथांमध्ये या पदार्थाचा उल्लेख आहे. खरं तर, पुरण पोळी हे हिंदू धर्मातील प्रमुख देवता असलेल्या भगवान कृष्णाला आवडते असे मानले जाते.

पुरण पोळी, पिवळा हरभरा आणि उसाच्या साखर किंवा गुळाच्या मिश्रणाने भरलेली गोड सपाट भाकरी आहे. महाराष्ट्रात होळीच्या सणाच्या वेळी बनवण्याच्या प्रथेम ागील कारण कदाचित कापणीचा सण म्हणून या सणाच्या कृषी उत्पत्तीमध्ये आहे. होळी सामान्यतः भारतात गहू, हरभरा आणि ऊस कापणीच्या वेळी साजरी केली जाते, जे पुरण पोळी बनवण्यासाठी वापरले जाणारे प्राथमिक घटक आहेत. ताज्या कापणी केलेल्या पिकांचा हंगाम त विधीपूर्वक देवाला आभार म्हणून अर्पण करणे आणि उत्सवाचे जेवण म्हणून याचा स्वाद घेणे हे तर्क असावे.

पुरणपोळीची तयारी अगदी सोपी आहे. डिश मूलतः गूळ, वेलची आणि जायफळ मिसळून उकडलेली आणि मॅश केलेली चना डाळ याचे भरणे तयार करुन नंतर ते गव्हाच्या पिठाच्या पिठात भरले जाते आणि लाटून किंवा हातावर फिरवून पोळीचा आकार दिला जातो. नंतर पोळी तव्यावर भाजून पोळी तूप किंवा दुधासह गरम सर्व्ह केली जाते.

पुरण पोळी भारतीय पाककृतीमध्ये एक स्वादिष्ट पदार्थ मानली जाते आणि त्याची लोकप्रियता त्याच्या समृद्ध चव आणि पोतमुळे दिली जाऊ शकते. पदार्थ स्वादिष्ट आणि पौष्टिक आहे कारण त्यात प्रथिने, फायबर आणि इतर आवश्यक पोषक घटक असतात.

पुराण पोळीचा उगम सण आणि धार्मिक समारंभांमध्ये देवतांना अन्न अर्पण करण्याच्या प्राचीन भारतीय परंपरेशी जवळून जोडलेला आहे. खरं तर पुरण पोळी हा भारतभर साजऱ्या होणाऱ्या होळीच्या सणांमध्ये गणपतीला दिल्या जाणाऱ्या प्रसादाचा एक भाग आहे.

### पुरण तयार करण्यासाठी खास टिप्स

कालांतराने पूरण पोळी हा पदार्थ भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांच्या रुचीनुसार आणि आवडीनुसार विकसित झाली आहे. उदाहरणार्थ महाराष्ट्रात, पुरण पोळी सामान्यतः गूळ, हरभरा आणि नारळापासून बनवलेल्या गोड पदार्थाने बनविली जाते, तर गुजरातमध्ये, मसूर आणि मसाल्यांनी बनवलेल्या चवदार भरणासह डिश तयार केली जाते. पुरणपोळी हा महाराष्ट्र आणि कोकण पट्ट्यातील होळी उत्सवाचा अविभाज्य भाग आहे आणि समृद्ध इतिहास असलेली ही साधी मिष्टान्न भारतीय इतिहासातील विविधता दर्शवते.



## धूलिवंदन

धूलिवंदन हा सण होळीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. यास धुळवड असेही म्हटले जाते. या दिवशी महाराष्ट्रात सार्वजनिक सुट्टी असते. हा सण फाल्गुन कृष्ण प्रतिपदेला साजरा करतात. परंपरेप्रमाणे या दिवशी होलीका दहनाची राख एकमेकांना लावतात.

कोकणात प्रत्येक गावाचे धूलिवंदन वेगवेगळ्या दिवशी असू शकते. या गावाचे धूलिवंदन सामान्यतः होळीच्या १५व्या दिवशी असते.

फाल्गुन हा शालिवाहन शक महिन्यातील शेवटचा म हिना आहे. त्यामुळे होळी हा हिंदू दिनदर्शिकेनुसार येणाऱ्या महिन्यातील शेवटचा सण असतो. होळी पेटवून दुसऱ्या दिवशी म्हणजे धुलीवंदनाच्या दिवशी जमिनीला, मातीला नमस्कार करण्याची प्रथा आहे. प्रत्येक प्राणी मात्राचा देह हा पंचमहाभूतांपासून बनलेला असतो. पृथ्वी, आप, त्वज, वायू, आकाश असा या पंचमहाभूतांचा क्रम आहे. पृथ्वी पासून सुरुवात आणि आकाशापर्यंत शेवट असे पंचक असणाऱ्या या तत्वांना आपल्या सणांच्या मधून आदर व्यक्त करण्याचा एक दिवस म्हणजे धूलिवंदन. यादिवशी पृथ्वीला वंदन केले जाते. त्यानंतर १५ दिवसांनी नववर्षाची म्हणजे पाडव्याच्या दिवशी आकाशाला भिडणारी गुढी उभारण्याची पद्धत आहे.

या दिवशी सकाळी घरातील बायका पाण्याची तपेली, घागरी, हंडे पाण्याने भरुन होळी पेटवलेल्या जागी ठेवतात. सूर्याच्या उन्हाने हे पाणी तापते. या पाण्याने लहान मुलांना अंघोळ घालतात. असे मानले जाते की या पाण्याने अंघोळ केली असता लहान मुलांना किंवा कोणालाही उन्हाळा बाधत नाही. या दिवसात कै-याही मिळू लागतात. कै-या उकडून त्याचा गर लहान मुलांना अंगाला लावून स्नान घालतात. मोठी माणसे होळीवर पाणी शिंपडून ती राख कपाळाला लावतात. अंगाला फासतात व नंतर स्नान करतात.

काही ठिकाणी आजकाल लोकांनी आपापल्या सोयीनुसार होळीच्या दुस-या दिवशी रंगपंचमी साजरी करण्याची प्रथा सुरु केली आहे. त्यात लहान-मोठे, स्त्रिया-पुरुष सरसकट सगळे उत्साहाने रंग खेळतात. परंतु रंगपंचमी हा वेगळा सण आहे.



## रेल्वेवर फुगे फेकणाऱ्यांची खैर नाही

### रुळांजवळ रेल्वे पोलीस बंदोबस्त ठेवणार



**मुंबई :** धावत्या रेल्वे गाड्यांवर रंगाने भरलेले, पाण्याचे फुगे फेकल्यास कारवाई करण्याचा इशारा रेल्वे पोलिसांनी दिला आहे. याशिवाय रेल्वे परिसरात मद्यपान करणारे व मद्यपान करून गोंधळ घालणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. रेल्वे प्रवाश्यांच्या सुरक्षेसाठी रेल्वे रुळाजवळील वस्त्यांमध्ये रंगाचे फुगे न फेकण्याबाबत जनजागृती करण्यात आली असून त्या ठिकाणी बंदोबस्तही ठेवण्यात येणार असल्याची माहिती रेल्वे पोलिसांकडून देण्यात आली. मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयामार्फत रेल्वे स्थानकांवर होळी व धुलीवंदन सणाच्या पार्श्वभूमीवर कडक बंदोबस्त तैनात केला आहे. त्याचबरोबर मुंबई लोहमार्ग पोलिसांमार्फत विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. त्यामार्फत रेल्वे स्थानकांवर विशेष गस्त घालण्यात येणार आहे. महिला प्रवाशांची छेड काढणाऱ्या व त्रास देणाऱ्यांवर विशेष कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे रेल्वे रूळानजीक असणाऱ्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या धावत्या रेल्वे वर पाण्याचे फुगे न मारण्याबाबत जनजागृती संबंधित रेल्वे पोलीस ठाण्याकडून करण्यात येत आहे. तसेच रेल्वे स्थानकांवरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातूनही प्रवाशांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येणार आहे. रेल्वे रूळालगत वस्ती असणाऱ्या शीव, वडाळा, कुर्ला आणि पश्चिम- रेल्वेच्या वांद्रे, माहीम सारख्या रेल्वे स्थानकांवर योग्य तो बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच रेल्वेवर फुगे व पाणी फेकणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश पथकांना देण्यात आले आहेत. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवणार नाही, यादृष्टीनेही विशेष लक्ष ठेवण्याबाबतच्या सूचना पोलिसांना देण्यात आल्या आहेत.

### कडोंमपाच्या जनता दरबारातील तक्रारींची ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक

## छाननीमधील निवेदनांची जनता दरबारात दखल

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली पालिकेच्या जनता दरबारात सहभागी होण्यासाठी नागरिकांना यापुढे आपल्या तक्रारी कल्याण डोंबिवली पालिकेच्या 'केडीएमसी २४ बाय सात' या उपयोजनवर ऑनलाईन माध्यमातून अगोदर नोंदणीकृत करणे आवश्यक आहे. या तक्रारींची प्रशासनाकडून छाननी झाल्यानंतर या तक्रारी जनता दरबारात घेतल्या जातील, असे कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी दुपारी तीन ते पाच वेळेत आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांचा जनता दरबार असतो. या दरबारात आपले म्हणणे मांडण्यासाठी सुमारे दोनशेहून अधिक नागरिक नागरी समस्या आणि पालिकेशी संबंधित इतर तक्रारी घेऊन येतात. दोन तासांच्या अवधीत एवढ्या तक्रारींचे निराकरण करणे शक्य होत नाही. त्यामुळे अनेक नागरिक नाराज होतात. पालिका अधिकाऱ्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. यापुढे जनता दरबारात दाखल होणारी तक्रार ही पहिले पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून तपासली जाईल. या तक्रारीचे स्वरुप आणि ही तक्रार पुन्हा पुन्हा आयुक्तांसमोर मांडली जाते का, याची खात्री पटल्यावरच ती तक्रार जनता दरबारासाठी घेतली जाईल. सतत त्याच




स्वरुपाच्या तक्रारींची छाननी करून मगच त्या जनता दरबारात घेण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील अनेक नागरिक आपल्या तक्रारी शासनाचे विविध विभाग, आपले सरकार, समाज माध्यमांतून करत असतात. शासनाच्या विविध विभागातून त्या तक्रारी निराकरण करण्यासाठी पालिकेत पाठविल्या जातात. त्याचवेळी नागरिकही त्याच तक्रारी घेऊन पालिकेत जनता दरबारात येतात. एका तक्रारीसाठी पालिका अधिकाऱ्यांना शासन, त्यांचे विविध विभाग यांनाही उत्तर द्यावे लागते. समाज माध्यमातील तक्रारींना स्पष्टीकरण द्यावे लागते.

एकाच साच्यातील तक्रारींचे स्वरूप कमी करण्यासाठी, काही ठराविक तक्रारदार हे ठराविक तक्रारी करत असल्याचे निदर्शनास आले आहे. या सगळ्या एकाच प्रकारच्या वाढत्या तक्रार अर्ज आणि त्यांना उत्तरे देण्याच्या प्रक्रियेला आळा बसावा. प्रत्येक तक्रारीचे पालिका अधिकाऱ्यांना निराकरण करता यावे, एकाच ठराविक तक्रारदाराची तक्रार जनता दरबारात उत्तर देण्यासाठी येऊ नये साठी प्रशासनाने जनता दरबारात तक्रार दाखल करण्यापूर्वी ती पालिकेच्या ऑनलाईन उपयोजनवर दाखल करावी. या तक्रारींची पालिका अधिकारी दखल घेऊन त्याचे निराकरण करतील.

ऑनलाईन माध्यमातून छाननी झालेल्या तक्रारीच आयुक्तांच्या जनता दरबारात घेण्यात येतील. यापूर्वी जनता दरबारात निकाली काढलेल्या तक्रारी पुन्हा जनता दरबारात विचारात घेतल्या जाणार नाहीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.आतापर्यंत आयुक्तांनी अनेक वेळा जनता दरबार आयोजित केले, पण त्या दरबारात आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड उपस्थित नव्हत्या, अशा तक्रारी निर्भय बनोचे संस्थापक महेश निंबाळकर, तक्रारदार उज्वला पाटील यांनी केल्या.

## 'एक गाव, एक होळी' उत्साहात साजरी

### पारंपारिक वेशभुषेत कोळीबांधवांचा सहभाग



**ठाणे :** शहरातील चेंदणी कोळीवाडा येथे होळीच्या पूर्वसंध्येला साजरी होणारी 'एक गाव एक होळी' ही चळवळ गावकीच्या एकजुटीची प्रतीक मानली जाते. दरवर्षीप्रमाणे यंदाही चेंदणी कोळीवाडा कोळी जमात ट्रस्ट, ठाणे यांच्या वतीने होळीच्या पूर्वसंध्येला ह्यएक गाव एक होळीह्नचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व आगरी कोळी बांधव, महिला पारंपारिक वस्त्रे परिधान करुन एकत्र येत मोठ्या उत्साहात होळी साजरी केली. यावेळी कोळीगीते आणि कोळी बॅण्डवर सर्व कोळी बांधव ताल धरला. फाल्गुन महिन्यात येणारा होळीचा सण उत्साह आणि जल्लोषाची पर्वणी असते. महाराष्ट्रात विशेषतः कोकणात 'शिमगा' म्हणजेच 'होळी' हा सण साजरा करण्याची पारंपारिक प्रथा वर्षांनुवर्षांपासून चालत आली आहे. त्याचप्रमाणे, ठाण्यातील चेंदनी कोळीवाडा येथे 'एक गाव एक होळी' ही प्रथा अनेक वर्षापासून जोपासली जात आहे. 'एक गाव एक होळी' ही पद्धत खरंतर फार पूर्वीपासूनची होती. परंतू, ८४ वर्षांपूर्वी हा उत्सव काही कारणास्तव बंद झाला होता. २०१५ साली कोळी जमात ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रकात नाखवा होते. त्यावेळी त्यांनी पुढाकार घेऊन या उत्सवाला पुन्हा नव्याने सुरुवात केली. त्यानुसार, यंदा या 'एक गाव एक होळी' चे हे ११ वे वर्षे असल्याची माहिती या गावातील डॉ. गिरीश साळगांवकर यांनी दिली. या उत्सावात गावातील नविन जोडपी पारंपारिक वेशभुषेत सहभागी होतात. नविन जोडप्यांच्या हस्ते होळीची पूजा करण्याची परंपरा गेले वर्षानुवर्ष या गावात सुरु आहे. तसेच गावातील आबालवृद्ध, महिला, तरुण यांचाही उत्स्फूर्त सहभाग यावेळी पाहायला मिळतो. तर,ठाणे शहरातील चेंदणी कोळीवाड्यासह कोपरी गाव, हजुरी गावठाण आणि महागिरी कोळीवाडा येथेही गेले अनेक वर्षांपासून ''एक गाव, एक होळी'' मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. यावर्षी विविध गावांमध्ये होळी उत्सवाच्या निमित्ताने अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विशेषतः तरुणांसाठी होळी क्रिकेट चषक स्पर्धांचे आयोजन झाले असून विजेत्यांना बोकड, कोंबडी आणि अंडी असे पारंपरिक बक्षीसे देण्यात आली. यामुळे या स्पर्धांना उत्तम प्रतिसाद मिळाला. 'आमच्या दाराशी हाय शिमगा, ''सण शिमग्याचा आयलाय रे आमचे गावा'' अशा होळीशी निगडिच विविध गाण्यांच्या तालावर कोळी बांधवांनी एकत्रित येत नृत्य सादर केले. वर्षानुवर्षांपासून सुरु असलेला 'एक गाव एक होळी' चा उत्सव पाहण्यासाठी शहराच्या विविध भागातील नागरिक याठिकाणी येतात. यंदाही हा उत्सव पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

## विजेअभावी शेतकऱ्यांचेही व्यवस्थापन बिघडले, पाण्याचे चक्र बिघडले, रोपवाटिका शेतकरीही चिंतेत

**बदलापूर :** बदलापूर आणि परिसरात सुरू विजेच्या लपंडावाचा बदलापूर शहराच्या वेशीवर असलेल्या तसेच अंबरनाथ तालुक्यातील शेतकऱ्यांना, शेतघरांना आणि रोपवाटिका शेतकऱ्यांनाही फटका बसतो आहे. प्रायोगिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे पिकांना पाणी देण्याचे चक्र बिघडते आहे. वाढत्या तापमानात पाण्याचा माराही अधिक करावा लागत असताना विजेअभावी हे पाणी देताना रोपवाटिका शेतकऱ्यांची तारांबळ उडते आहे. त्यामुळे शेतीचे व्यवस्थापन बिघडू लागले आहे.

गेल्या काही वर्षात बदलापूर आणि अंबरनाथ तालुक्यात मोठ्या संख्येने नागरिकरण झाले. त्या तुलनेत



### रोपवाटिका शेतकऱ्यांना फटका

रोपवाटिकांमध्ये कमी वयाची रोप असतात. त्यांना वेळोवेळी पाणी देण्याची गरज असते. वाढत्या तापमानात पाणी देण्याची वारंवारताही वाढते. अशावेळी वीज नसल्याने पाणी देण्यात अडचणी येतात. काही शेतकऱ्यांनी पाण्याच्या टाक्या बसवण्यास सुरूवात केली आहे. मात्र विजेचा अखंडीत पुरवठा होणे आवश्यक आहे, अशी भावना रोपवाटिकाधारक शेतकरी व्यक्त करत आहेत. तर या भागात अनेक शेतघरेही असून त्यात आता पर्यटक मोठ्या संख्येने येतात. पण विजेअभावी दुपारच्यावेळी पर्यटकांना आणि परिणामी शेतघर मालकांनाही त्याचा फटका बसतो आहे.

त्यांना मिळणाऱ्या पायाभूत सुविधा मात्र तितक्याच राहिल्या. याचा सर्वाधिक परिणाम महावितरणाच्या वीज वितरण सेवेवर झाल्याचे दिसून येते. दरवर्षी अंबरनाथ, बदलापुरात मार्च ते मे दरम्यान तापमानात वाढ झाल्यास विजेची मागणी वाढते.

या काळात अनेक ठिकाणी विजपुरवठा खंडीत होतो. परिणामी वीज भाराचे व्यवस्थापन करावे लागते. त्यामुळे काही भागांना काही तास विजेविना काढावे लागतात. याबाबत महावितरण जाहिरपणे सांगत नसले तरी त्याचा ग्राहकांना थेट फटका बसतो आहे. त्यातच मंगळवारपासून अंबरनाथच्या आनंदनगर वाहिनीवर रोहित्र क्षमता वाढीच्या कामाला सुरूवात झाली आहे. या कामामुळे आनंदनगर वाहिनीवरील बदलापूर पूर्वेतील काही भागांना फटका बसतो आहे. मात्र विजेचा लपंडाव नित्याचा असल्याचा आरोप बदलापुरातील उद्योजकांच्या बिवा संघटेनेने केला आहे.

यामुळे उत्पादनात घट होत असल्याची ओरड होत असताना आता शेतकरीही महावितरणाच्या कारभारावर संताप व्यक्त करत आहेत. अंबरनाथ तालुक्यात बदलापूर शहराच्या वेशीवर अनेक शेतकरी आजही शेती करतात. अनेक प्रयोगशील शेतकरी विविध पिके घेत असतात. याच भागात शेतघरे, रोपवाटिकाही विकसीत करण्यात आल्या आहेत. या सर्वांना विजेच्या लपंडावाचा फटका बसतो आहे.

**पाण्याची चक्र बिघडले**

विजेच्या लपंडावाचा फटका सातत्याने बसतो. यामुळे पाणी देण्याचे चक्र बदलले आहे. पाण्याचे चक्र बदलल्याने पिकांवर परिणाम होण्याची भीती कृषीभूषण राजेंद्र भट यांनी व्यक्त केली आहे. सध्या तापमान वाढत असल्याने पाणीही अधिक द्यावे लागते आहे, असेही भट लोकसत्ताशी बोलताना म्हणाले.

## वेश्या व्यवसायप्रकरणी शिक्षिका अटकेत

**ठाणे :** ठाणे पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने वेश्या व्यवसाय चालवणाऱ्या एका महिलेस अटक केली आहे. ही महिला मुंबई येथील एका नामांकित शाळेमध्ये शिक्षिका म्हणून काम करत होती. मागील तीन वर्षांपासून ती वेश्या व्यवसाय चालवित असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली आहे.

घोडबंदर येथील चितळसर मानपाडा भागात वेश्या व्यवसाय चालविणारी दलाल महिला बुधवारी तिच्या तावडीत असलेल्या काही महिलांना वेश्यागमनासाठी आणणार असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी, पोलीस उपनिरीक्षक स्नेहल शिंदे, साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक डी. के. वालगुडे, पोलीस हवालदार आर. यु. सुवारे, के. बी. पाटील, व्ही. आर. पाटील यांच्यासह पोलीस पथकाने सापळा रचून दलाल महिलेला ताब्यात घेतले.

तिची चौकशी केली असता ती मुंबईतील एका नामांकित शाळेत शिक्षिका असल्याचे समोर आले आहे. तसेच ती वेश्या व्यवसाय चालवित असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या प्रकरणात पोलिसांनी दोन महिलांची तिच्या तावडीतून सुटका केली आहे. तर वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या महिलेविरोधात चितळसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तिला अटक केली आहे.




## अनिवासी भारतीय महिलेची शेअर गुंतवणुकीतून ५१ लाखाची फसवणूक

**कल्याण :** नोकरीनिमित्त लंडनमध्ये स्थायिक असलेल्या कल्याणमधील महाजनवाडी भागातील एका मूळ निवासी नोकरदार महिलेची एका अज्ञाताने शेअर गुंतवणुकीत वाढीव परतावा देतो असे अमिष दाखवून ५१ लाख ५६ हजार रूपयांची फसवणूक केली आहे. या फसवणूक प्रकरणी या महिलेच्या नातेवाईक आणि फसवणूक झालेल्या महिलेने कल्याण मधील महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.

पोलीस ठाण्यातील माहिती, अशी की कल्याणमधील महाजनवाडी भागातील एक कुटुंब लंडन येथे पर्यटन व्यवसाय आणि नोकरीनिमित्त राहते. फसवणूक झालेली महिला एका औषध कंपनीत नोकरी करतात. दोन महिन्यापूर्वी लंडनमधील घरी असताना त्यांना फेसबुकच्या माध्यमातून शेअर व्यवहार शिक्षण मार्गदर्शन घेऊ शकता का, अशी जाहिरात पाहिली. या जाहिरातीची जुळणी उघडताच तक्रारदार महिलेचा मोबाईल क्रमांक एका व्हॉटसपक्रमांकाशी जोडण्यात आला. त्यानंतर त्यांना शेअर गुंतवणुकीतून झटपट कमी कालावधीत वाढीव नफा कसा मिळू शकतो, अशा प्रकारची ऑनलाईन माध्यमातून माहिती देण्यात आली. तक्रारदार महिलेचा विश्वास संपादन केल्यानंतर त्यांना शेअर गुंतवणुकीसाठी विविध प्रकारच्या जुळण्या अज्ञाताकडून पाठविण्यात आल्या.

शेअर गुंतवणुकीचे मुख्य कार्यालय अमेरिकेत आहेत. अलीकडेच मुंबईत शाखा उघडण्यात आली आहे. आपण आपले बँक खाते उघडण्यासाठी आपण भारत देशाची निवड करा, असे फसवणूक झालेल्या महिलेला अज्ञाताकडून सांगण्यात आले. मिळालेल्या माहितीप्रमाणे महिलेने आपली व्यक्तिगत, बँक खातेविषयक माहिती अज्ञातांनी पाठविलेल्या जुळणी आणि ऑनलाईन माध्यमातून संबंधितांना दिली. शेअर गुंतवणुकीसाठी अज्ञातांनी महिलेकडून सुमारे ३० हून अधिक बँक व्यवहारातून ५१ लाख ५६ हजार रुपए संबंधितांनी दिलेल्या बँक खात्यावर भरणा केले.

गुंतवणूक केलेल्या रकमेवर आपणास मोठा परतावा मिळणार असल्याचे उपयोजनच्या माध्यमातून तक्रारदार महिलेला दिसत होते. ती वाढीव रक्कम काढण्याचा प्रयत्न महिलेने केला. पण त्यासाठी वाढीव रक्कम भरणा करावी लागेल अशी अट टाकण्यात आली. या सगळ्या प्रकारातून आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या निदर्शनास आले. आपल्या नातेवाईकाच्या माध्यमातून आणि स्वता फसवणूक झालेल्या महिलेने महात्मा फुले पोलीस ठाण्यात अज्ञाता विरुध्द तक्रार केली आहे.

## शहरातील मोकळ्या जागेत 'एमडी'ची विक्री... एकाला अटक

**ठाणे :** मुंब्रा येथे एका मोकळ्या जागेत मेफेड्रॉन (एमडी) या अमली पदार्थाची विक्री करणाऱ्या परवेझ खान (२२) याला मुंब्रा पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी त्याच्याकडून मोबाईल आणि ६३ ग्रॅम वजनाचे १ लाख ५७ हजार रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त केले आहे.

मुंब्रा येथील मित्तल मैदान परिसरात एकजण मोकळ्या जागेत एमडी या अमली पदार्थाची विक्री करत असल्याची माहिती मुंब्रा पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, मुंब्रा पोलीस ठाण्याच्या पथकांनी सोमवारी रात्री सापळा रचला. त्यावेळी एका तरुणाची हालचाल पोलिसांना संशयास्पद वाटली. पोलिसांच्या पथकाने त्या व्यक्तीला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता, त्याने त्याचे नाव परवेझ असल्याचे सांगितले. तसेच तो मुंब्रा येथील अमृतनगर भागात राहत असल्याची कबूली दिली. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता, त्याच्या पँटच्या खिशामध्ये एमडी पावडचे पाकिट आढळून आले. हे एमडी पावडर ६३ ग्रॅम इतक्या वजनाचे होते. पोलिसांनी त्याची विचारणा केली असता, त्याने हे अमली पदार्थ त्याचे असल्याची कबूली दिली. याप्रकरणी त्याच्याविरोधात मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

## आईने मुलीला २९ व्या मजल्यावरून ढकलले, नंतर आत्महत्या

**पनवेल :** येथील मॅराथॉन नॅक्सॉन इमारतीत बुधवारी सकाळी घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेत एका आईने आपल्या आठ वर्षीय मुलीला २९ व्या मजल्यावरून खाली ढकलले. यात मुलीचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर संबंधित महिलेने देखील उडी मारून आत्महत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पनवेलमधील पळस्पे फाटा येथे मॅराथॉन नॅक्सॉन या उच्चभ्रू




इमारतीत २९ व्या मजल्यावरील सदनिकेत आशिष दुवा आपल्या पत्नी आणि मुलीसह राहत होते. आशिष यांची पत्नी मैथिली (वय ३७) या काही काळापासून मानसिक तणावाखाली होत्या असे बोलले जात आहे. बुधवारी सकाळी साडेआठच्या सुमारास मैथिली यांनी आपल्या आठ वर्षीय मुली मायरा हिला बेडरूमच्या खिडकीतून खाली फेकले. यामध्ये मुलीचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर काही वेळातच मैथिली यांनी स्वतः उडी मारून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. या घटनेनंतर इमारतीतील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. मैथिली यांच्या पतीने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, मैथिली यांच्या विरोधात खुनाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## निळजेतील लोढा हेवनजवळील भुयारी गटारात मृत अर्भक

**डोंबिवली :** शिळफाटा रस्त्यावरील डोंबिवली जवळील निळजे गावाजवळील लोढा हेवन या गृहसंकुल परिसरातील भुयारी गटात एक चार ते पाच महिन्यांचे मृत अर्भक मानपाडा पोलिसांना आढळले. पोलिसांनी हे मृत अर्भक भुयारी गटारात फेकून देणाऱ्या अज्ञात इसमा विरुध्द भारतीय न्याय संहिता कलम ९४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



निळजे येथील एका गृहसंकुलात राहत असलेल्या एका सेवानिवृत्त व्यक्तिने मानपाडा पोलिसांना माहिती दिली की निळजे येथील लोढा हेवन परिसरातील भुयारी गटारात एक अर्भक फेकून देण्यात आले आहे. मानपाडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या नेतृत्वाखाली एक पोलीस पथक घटनास्थळी आले.

पोलीस निरीक्षक राम चोपडे, दत्तात्रय गुंड, साहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास ढोले यांनी घटनास्थळाची पाहणी केली. त्यावेळी त्यांना चंद्रेश मेमोरिअल शाळे समोर, निळजे लोढा हेवन येथील सुंकलाजवळ भुयारी गटारात चार ते पाच महिन्यांचे अर्भक अज्ञातांनी फेकून दिल्याचे आढळले. हे अर्भक मृत होते. ते स्त्री की पुरूष जाती आहे हे पोलीस तपासात निष्पन्न झाले नाही. भुयारी गटारातून अर्भक बाहेर काढण्यात आले.

कायदेशीर पालकत्व लपविण्याच्या उद्देशाने अज्ञाताने हे कृत्य केल्याचा संशय व्यक्त करून पोलिसांनी अज्ञाता विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. लोढा हेवन परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासून हे कृत्य कोणी केले याचा तपास सुरू केला आहे.

## जंगलात धुलिवंदनाला दणदणाट, हॉटेलमध्ये पार्ट्यांचे आयोजन

**ठाणे :** पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील असलेल्या येऊरच्या जंगलात यावर्षी होळी आणि धुलिवंदनानिमित्ताने पुन्हा एकदा जंगी पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्ट्यांमध्ये मोठ्या आवाजातील ध्वनीक्षेपकावर नाचगाणी, पाण्याची नासाडी होणार आहेत. त्यासाठी एक हजार ते दोन हजार रुपयांचे तिकीट देखील आहे. मद्यपान देखील या हॉटेलमध्ये होणार आहे. त्यामुळे प्राण्यांच्या या जंगलात हुल्लडबाजांच्या पार्टीला केव्हा आवर बसणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच, या जंगलातील मुख्य रस्त्यावर दोन बिबट्यांचा वावर आढळला होता. असे असतानाही पार्ट्या आयोजित केल्याने वन्य जीवांच्या अधिवासाविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. मुंबईमध्ये विस्तीर्ण पसरलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा येऊर वन परिक्षेत्र हा पर्यावरणीदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आहे. या जंगलामध्ये बिबट्यांसह विविध प्राणी, पक्षी, कीटक आणि दुर्मिळ वनस्पती आढळते. असे असले तरी या जंगलामध्ये बेकायदा बांधकामे, हॉटेल आणि टर्फ तयार झाले आहेत. त्यामुळे जंगलाचे लचके तुटले आहेत. रात्री उशीरापर्यंत सुरू असलेले विवाह समारंभ,



त्यासाठी वापरण्यात आलेला प्रखर प्रकाशझोत यामुळे निशाचर प्राणी पक्षी यांच्यावर त्याचा परिणाम होतो. येथील गोगांटाविरोधात पर्यावरणवादी आणि गावकऱ्यांनी मोहीम हाती घेतली होती. त्यानंतर काही प्रमाणात येथील पाट्यांवर निर्बंध आली होती. परंतु आता पुन्हा या पाट्या सुरू झाल्याचे स्पष्ट होत आहे. धुलिवंदनाच्या दिवशी काही हॉटेल मालकांनी येथे पार्ट्यांचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी येऊरच्या रस्त्यांवर फलकबाजी समाजमाध्यमांवर जाहीरबाजी सुरू करण्यात आली आहे. या पार्ट्यांसाठी ध्वनी क्षेपक देखील वापरण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या जंगलातून नागरिकांना वाहतुक करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मुख्य मार्गिकेवर दोन बिबटे आढळून आले होते. या घटनेस अद्याप आठवडा देखील पूर्ण झालेला नाही. परंतु असे असतानाही या पार्ट्यांचे आयोजन केले जात असल्याने जंगलाचा वापर आता पार्ट्यांसाठी होत असल्याचे उघड झाले आहे. यासंदर्भात वर्तकनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार वाघचवरे यांना विचारले असता, त्यांनी तपासून कायदेशीर कारवाई करणार असल्याचे सांगितले. तर वन विभागाचे वन परिक्षेत्र अधिकारी मयुर सुरवसे यांना विचारले असता, होळी निमित्ताने येऊरमध्ये गस्त घालण्यात येत असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

> "येऊर वन परिक्षेत्र संवेदनशील आहे. असे असतानाही पार्ट्यांचे आयोजन होते. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच येऊरच्या मुख्य रस्त्यावर दोन बिबटे आढळून आले होते. महापालिकेकडे येथील हॉटेलच्या अतिक्रमणा बाबतच्या अनेक तक्रारी आहेत. परंतु पुरेशी कारवाई होत नाही. येथे मद्य देखील विना परवाना विक्री केले जाते."
>
> **-निशांत बंगेरा, पर्यावरणवादी कार्यकर्ते.**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १03, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००0१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com